POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२६७ ● मुंबई, मंगळवार, २९ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## शासनाच्या सर्व सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### जो विभाग त्यांच्या सेवा ऑनलाईन करणार नाहीत त्यांना दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता १००० रुपयांचा दंड आकारणार

**■मुंबई । प्रतिनिधी :**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अधिकाधिक लोकाभिमुख झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करा. १५ ऑगस्ट पर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करा. शासनाचा विभाग १५ ऑगस्टपर्यंत जो विभाग त्यांच्या सेवा ऑनलाईन करणार नाहीत त्या विभागाला दर दिवशी प्रत्येक सेवेकरिता एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल. शासनाकडून कोणत्या सेवा नागरिकांना दिल्या जातात याची शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना या विषयाबाबत माहिती व्हावी यासाठी या अधिनियमाचा अभ्यासात समावेश करण्यासाठी कार्यवाही करावी अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे सामान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन) व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची ''दशकपूर्ती'' आणि ''प्रथम सेवा हक्क दिन'' निमित्त राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.यावेळी या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव,ब्रँड अँबेसिडर पद्मश्री शंकर महादेवन, सोनाली कुलकर्णी, माजी राज्य सेवा हक्क मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रीय,राज्य सेवा हक्क कोकणचे आयुक्त बलदेव सिंह, पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यासह प्रशासनातील ज्येष्ठ वरिष्ठ सनदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सध्या हजार पेक्षा जास्त सेवा या कायद्याच्या अंतर्गत अधिसूचित केल्या आहेत. जवळपास ५८३ सेवा ऑनलाइन दिलेल्या आहेत. अजून ३०० सेवा या ऑनलाइन आणायच्या आहेत तर १२५ सेवा ऑनलाइन आहेत पण त्या कॉमन पोर्टलवर उपलब्ध नाहीत आणि म्हणून शासनाच्या सर्व विभागांना १५ ऑगस्ट पर्यंत सर्व सेवा ऑनलाईन करा.१५ ऑगस्ट पर्यंत शासनाच्या सर्व सेवा ऑनलाईन करा.जो शासनाचा विभाग १५ ऑगस्ट पर्यंत झाली नाही त्या विभागातील प्रत्येक सेवेकरिता दर दिवशी प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड आकारला जाईल असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे मूलभूत अधिकार आपल्या संविधानात समाविष्ट केले हे मूलभूत अधिकार अधिकार सर्वांना मिळाले पाहिजेत.गेल्या दहा वर्षात तंत्रज्ञानाच्या गतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात फरक पडलेला आहे आणि म्हणून या सेवा अधिक गतिमान पद्धतीने करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत.मंत्रालयात चेहरा पडताळणी ॲपमुळे देखील निम्मी गर्दी कमी झाली आहे. जीवनामध्ये इज ऑफ लिविंग आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.शासनाची सर्व सेवा व्हॉटसॲप वर तसेच सर्व माहिती संकेतस्थळावरती उपलब्ध झाल्यास अनेक तक्रारी कमी होवून लोकांचे जीवनमान सुसह्य होईल असेही ते म्हणाले.

**लोकसेवा हा केवळ कायदा नाही तर ती एक उदात्त भावना : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, लोकशाहीत लोकांसाठी कर्तव्य भावनेने काम करायचे असते. लोकसेवा हा केवळ कायदा नाही तर ती एक उदात्त भावना आहे असं आपण म्हणतो या वाक्याला लोकसेवा हक्क आयोगाने खरा अर्थ मिळवून दिला आहे. हा कायदा म्हणजे खऱ्या अर्थाने लोकशाहीची गंगोत्री आहे. नाविन्यपूर्ण उपक्रम वर्धा,यवतमाळ आणि कोल्हापूरच्या जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यात राबवले त्यांचा आताच सत्कार करण्यात आला.अशाच प्रकारे इतर जिल्ह्यातही काम केले जावे.खर तर जिथे समाजाला त्यांचे सर्व हक्क आणि अधिकार त्यांना सेवा दिल्या जातात तिथे प्रगती अटळ असते.हा कायदा प्रशासन व नागरिकांमधला विश्वासाचा एक पूल आहे असं म्हटलं तर वावग ठरणार नाही आणि म्हणून सर्वसामान्य जनतेच्या सक्षमीकरणाचा हा पाया अधिक मजबूत होईल आणि या अधिनियमच्या माध्यमातून लोकांना तात्काळ सेवा मिळतील असेही ते म्हणाले.





**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमच्या माध्यमातून अधिक सेवा देणार : मुख्य सचिव सुजाता सौनिक**

मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्याकी,अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला ऑनलाईन सेवा देण्यासाठी आयोग नक्कीच प्रभावी अंमलबजावणी करेल. मायक्रोसॉफ्ट सोबत देखील आपण यासाठी करार केला आहे.महाराष्ट्र डिजिटल गव्हर्नन्स मध्ये देशासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल असेही त्या म्हणाल्या.

यावेळी वर्ध्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा सेवादूत प्रकल्पाची सुरुवात केल्याबद्दल,यवतमाळचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी अभिप्राय कक्ष सुरू केल्याबद्दल कोल्हापूर चे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी कोल्हापूर जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प सुरू केल्याबद्दल माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमचे ब्रँड अँबेसिडर म्हणून पद्मश्री शंकर महादेवन, सोनाली कुलकर्णी यांना यावेळी घोषित करण्यात आले.

यावेळी राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी आयोगाची गेल्या दहा वषार्तील वाटचालीचा आढावा घेतला.या कायद्याच्या जनजागृतीसाटी आयोग नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणार असून भविष्यात आयोगाने हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती यावेळी दिली. पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यांनी आभार मानले.




## युद्धाचा तोरा, भिकेसाठी चीनपुढे कटोरा!

### पाकिस्तानने चीनकडे मागितलं १० अब्ज युआनचं कर्ज

पाकिस्तानने चीनला त्यांची विद्यमान स्वॅप लाइन १० अब्ज युआन म्हणजेच १.४ अब्ज डॉलर्स पर्यंत वाढवण्याची विनंती केली आहे. तसंच आम्हाला आशा आहे की देश वर्षाच्या अखेरीस पांडा बाँड लाँच करेल असं पाकिस्तानच्या मंत्र्यांनी म्हटलंय. भारताला युद्धाची धमकी देणाऱ्या पाकिस्तानला इतर देशांकडे भीक मागून आपल्या देशाच्या गरजा भागवाव्या लागत आहेत. महागाई आणि दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या पाकिस्तानसमोर असलेली संकटं त्यांच्या नेत्यांना दिसत नाहीयत का असा प्रश्न आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी :**




पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने आक्रमक भूमिका घेतली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानची चहूबाजुंनी कोंडी करायला सुरूवात केलीये. भारताच्या या ॲक्शननंतर पाकिस्तानातील अनेक नेत्यांनी युद्धाच्या धमक्याही दिल्या. मात्र युद्धाचा तोरा मिरवणाऱ्या पाकिस्तानच्या हातात कटोरा आलाय. आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या पाकिस्तानने चीनकडे आर्थिक मदतीची याचना केली आहे. जम्मू काश्मीरच्या पहलगाम हल्ल्यानंतर भारताने दहशतवादी आणि पाकिस्तानविरोधात आक्रमक भूमिका घेतलीये. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर कायदेशीर स्ट्राईक केलाय. त्यामुळे आपणही युद्धासाठी तयार असल्याची दर्पोक्ती पाकिस्तानच्या अनेक नेत्यांनी केली आहे. भारताला अण्वस्त्रांचीही धमकी देण्यापर्यंत पाकच्या नेत्यांची हिंमत पोहोचलीय. मात्र युद्धाचा तोरा मिरवणाऱ्या पाकिस्तानच्या हातात आता कटोरा आलाय. आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या पाकिस्तानने आता चीनसमोर आर्थिक मदतीसाठी कटोरा धरला आहे. पाकचे अर्थमंत्री मुहम्मद औरंगजेब यांनी चीनकडे कर्जाची मागणी केली. तब्बल १० अब्ज यिआन म्हणजेच १.४ अब्ज डॉलर्स एवढ्या कर्जाची मागणी पाकने चीनकडे केली आहे. ज्याची पाकिस्तानी चलनात किंमत ३९ हजार ३३३ कोटी रुपये इतकी आहे. एका वृत्त संस्थेला दिलेल्या मुलाखतीत पाकच्या अर्थमंत्र्यांनी ही मागणी केली.

## ईडी ऑफिसला आग, संशयाचा धूर... २४ तासानंतरही ईडी ऑफिसच्या आगीचं कारण अस्पष्ट

**■मुंबई । प्रतिनिधी :**

रविवारी सकाळी मुंबईच्या ईडी कार्यालयाला आग लागली. या आगीत अनेक महत्त्वाच्या प्रकरणांशी संबंधित कागदपत्र जळल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दरम्यान यानंतर विरोधकांकडून संशय व्यक्त करण्यात आला आहे. तर महत्त्वाची सर्व कागदपत्र डिजिटल स्वरुपात सुरक्षित असल्याचं स्पष्टीकरण ईडीकडून देण्यात आलं आहे.

मुंबईत ईडीच्या ऑफीसला आग लागलेल्या आगीवरुन चांगलंच राजकारण तापलं आहे. या आगीत महत्त्वाच्या फाईल्स जळून खाक झाल्याची माहिती आहे.



**ईडी कार्यालयाला आग**

रविवारी सकाळी ११ वाजता मुंबईतील ईडी कार्यालयाला आग लागली. आगीत मेहुल चोक्सी, नीरव मोदी, छगन भुजबळांच्या संबंधित फाईल जळाल्याची सूत्रांची माहिती आहे. सुमारे १० तासानंतर अग्निशमनदलाकडून आगीवर नियंत्रण मिळवण्यात आलं होतं. आगीमुळे कार्यालयातील चौथ्या मजल्यावर मोठं नुकसान झालं आहे. आगीचं कारण अस्पष्ट, चौकशीनंतर आगीचं कारण स्पष्ट करण्यात येणार आहे.

गेल्या काही वर्षापासून देशाचं राजकारण हे ईडीच्या अवतीभोवती फिरत आहे. त्यात आता ईडीच्या ऑफीसला लागलेल्या आगीनंतर विरोधकांकडून संशय व्यक्त केला जातो आहे. ईडी ऑफीसला लागलेल्या आगीनंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन पाटलांनी सरकारलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं आहे.

ईडी कार्यालयात लागलेल्या आगीनंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी देखील संशय व्यक्त केला आहे. ईडी ऑफिसला आग लागली की लावली गेली असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तर ईडी कार्यालयात लागलेल्या आगीची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी वकील असीम सरोदेंनी केली आहे. या आगीत छगन भुजबळ, नीरव मोदी, मेहुल चोक्सीं प्रकरणाशी संबंधित फाईल जळाल्याचा संशय व्यक्त केला जात असल्याचं सरोदे यांनी म्हटलं आहे.

२०१८ मध्येही आयकर विभागाच्या कार्यालयात लागलेल्या आगीत अनेक महत्त्वाची कागदपत्र जळाली होती. दरम्यान आता ईडी कार्यालयात लागलेल्या आगीनंतर देखील अनेक महत्त्वाच्या प्रकरणाशी संबंधित फाईल्स जळून खाक झाल्याचा संशय आहे.

## जन्मदात्याने मुलीचा जीव घेतला

**■जळगाव । प्रतिनिधी :**

सेवानिवृत्त सीआरपीएफ अधिकारी असलेल्या बापाने आपल्या विवाहित मुलीची गोळी झाडून हत्या केल्याची मन सुन्न करणारी घटना जळगावच्या चोपडा शहरात घडली आहे. या घटनेत मुलीच्या बापाने जावयावरसुद्धा गोळी झाडली. यात जावई गंभीर जखमी असून त्याला उपचारासाठी पुणे येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी गोळीबार करणाऱ्या बापाला बेदम मारहाण केल्याने तोसुद्धा गंभीर जखमी असून त्याच्यावर जळगाव शहरात खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या हत्याकांडाचे धक्कादायक कारण आता समोर आले आहे.



दोन वर्षांपूर्वी झालेल्या प्रेमविवाहामुळे वडिलांना राग आला होता. बहिणीच्या हळदी समारंभात आलेल्या मुलीवर वडिलांनी गोळीबार केला. यात मुलीचा मृत्यू झाला तर जावई गंभीर जखमी झाला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

**पळून जाऊ केलं लग्न**

तृप्तीने तिच्या वडिलांचा नकार असतानासुद्धा पळून जाऊन अविनाश यांच्यासोबत प्रेमविवाह केला होता. प्रेम विवाहानंतर तृप्ती तिच्या सासरी म्हणजेच पुण्यात राहात होती. पती अविनाश यांच्या सख्ख्या बहिणीचे जळगावच्या चोपडा शहरात लग्न असल्याकारणाने दोघेही लग्नासाठी चोपडा येथे आले होते. या ठिकाणी हळदीच्या कार्यक्रमानंतर सर्व नातेवाईक कुटुंबीय नाचत असताना याचवेळी तृप्तीचे वडील किरण मांगले तिथे आला.

**नवरा गंभीर जखमी, पुण्यात उपचार**

त्याने त्याच्याकडे असलेल्या परवानाधारक पिस्तुलातून नाचत असलेल्या तृप्ती तसेच जावई अविनाश यांच्यावर गोळीबार केला. यात तृप्ती जागीच ठार झाली तर अविनाश याला कमरेत गोळी शिरल्याने तो गंभीर जखमी असून त्याला पुढील उपचारासाठी पुण्याला हलवण्यात आलं आहे. या घटनेनंतर हळदीच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित संतप्त वऱ्हाडी ग्रामस्थांनी तृप्तीचे वडील किरण मांगले याला बेदम मारहाण केली.

**एकमेकांवर जीव कसा जडला?**

मिळालेल्या माहितीनुसार तृप्ती आणि अविनाश हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. तृप्ती आणि अविनाश हे पुण्यात शिक्षणाच्या निमित्ताने एकत्र आले. तृप्ती ही टइइर च्या दुसऱ्या वर्षाला पुण्यातील महाविद्यालयात शिक्षण घेत होती. या दोघांचे एकमेकांवर प्रेम झाले. हा प्रेम विवाह तृप्तीच्या सीआरपीएफमध्ये अधिकारी असलेल्या वडिलांना मान्य नव्हता. त्यानंतर तृप्ती आणि अविनाश यांनी पळून जाऊन लग्न केले. त्यानंतर ते दोघेही गुण्यागोविंदाने अविनाशच्या घरी संसार करू लागले.

**प्रेमविवाहाला होता किरण मांगलेचा नकार**

मात्र या प्रेमविवाहाला तिच्या वडिलांची मान्यता नव्हती. याचाच राग त्यांच्या मनात घर करून कायम होता. त्यामुळे तृप्तीचे वडील किरण मांगले हे तृप्तीला तसेच तिच्या सासरच्यांना कायम त्रास देत होते. विशेष म्हणजे एकदा तर किरण मांगलेने तृप्तीचा एकदा गर्भपातही केला होता. या वादामुळे तृप्ती परत माहेरी गेली नाही. अशी माहिती तिची सासू प्रियंका वाघ यांनी बोलताना दिले आहे.

## नामांकित आश्रमशाळेत अल्पवयीन विद्यार्थिनीसोबत धक्कादायक प्रकार

**■मुंबई । प्रतिनिधी :**

एका मुख्याध्यापकाने अल्पवयीन विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार सांगलीच्या जत तालुक्यातील आश्रम शाळेत घडला आहे. सनमडी येथे असणाऱ्या नामांकित आश्रम शाळेमध्ये हा प्रकार घडला असून या प्रकरणी आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकाला उमदी पोलिसांनी अटक देखील केली आहे. विनोद जगधने असे या अटक करण्यात आलेल्या मुख्याध्यापकाचे नाव आहे.

१८ एप्रिल रोजी सन्मडी मधल्या नामांकित आश्रम शाळेत मुख्याध्यापक असणाऱ्या विरोध जगधनेकडून विद्यार्थिनीचा विनयभंग करण्यात आल्याचा प्रकार घडला होता. त्यानंतर संबंधित मुख्याध्यापकाकडून पीडित अल्पवयीन मुलीला हा प्रकार कोणास सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती.




दरम्यान आश्रम शाळेला सुट्टी लागल्यानंतर पीडित मुलीने घरी आल्यावर आपल्या पालकांना या घटनेची माहिती दिली. त्यानंतर संतप्त झालेल्या पालकांनी आश्रम शाळेतल्या मुख्याध्यापकाला जाब विचारत बेदम मारहाण देखील केली होती. यानंतर हा सर्व प्रकार समोर आला होता.

मात्र नामांकित आश्रम शाळा असल्याने सदरचे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. पण काही पालकांनी याबाबत आवाज उठवल्यानंतर इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून आश्रमशाळेत चौकशी करण्यात आली. आणि अखेर या प्रकरणात मुख्याध्यापकाच्या विरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलाय.

मुख्याध्यापक विनोद जगधने याला अटक देखील करण्यात आली असून नरदन मुख्याध्यापकाकडून आणखी मुलींचे लैंगिक शोषण केल्याचा संशय पोलिसांच्याकडून व्यक्त करण्यात आला असून याबाबत तक्रार देण्याचं आवाहन उमदी पोलिसांच्याकडून करण्यात आला आहे. जतचे पोलीस निरीक्षक संदिप कांबळे यांनी यासंदर्भारत माहिती दिली.

## जळगावात इन्स्टाग्रामवर स्टेटस ठेवून तरुणाने उचललं भयंकर पाऊल

**■जळगाव । प्रतिनिधी :**

जळगावात एक अंगावर शहारे आणणारी घटना घडली आहे. प्रेमभंग झाल्याच्या कारणातून विद्यार्थ्याने कॉलेजच्या आवारातच गळफास घेतल्याचे प्रकरण समोर आले आहे. विद्यार्थी सकाळी कॉलेजमध्ये आल्यावर हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. इन्स्टाग्राम अकाउंटवर एक भावनिक स्टेटसदेखील या तरुणाने पोस्ट केले होते. जळगाव येथे ही भयंकर घटना घडली आहे. सत्तू कोळी असं आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.




प्रेमभंगाच्या दुःखातून एका महाविद्यालयीन विद्यार्थ्यानें थेट जळगावच्या सुट्टीच्या दिवशी महाविद्यालयाच्या आवारातील झाडाला दोरीने गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सत्तू कोळी असे या मयत विद्यार्थ्याचे नाव आहे. तो शहरातील एका दुसऱ्या महाविद्यालयात शिक्षण घेत होता. आत्महत्या करण्यापूर्वी सत्तू कोळी याने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक भावनिक स्टेटस देखील पोस्ट केले होते.

इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट करत त्याने स्टेटसदेखील ठेवले होते. जोपर्यंत ती येत नाही तोपर्यंत मला खाली उतरवू नका आणि माझ्यावर अंत्यसंस्कार करू नका, असा व्हिडिओ केला होता. त्यानंतर त्याने महाविद्यालयाच्या आवारातील एका झाडाला गळफास लावून आयुष्य संपवले. सकाळी कॉलेजमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लक्षात ही बाब येताच तात्काळ पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून मृतदेह जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# काश्मिरी पंडितांचे काय झाले?

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे विविध राज्यांमधून गेलेल्या २६ पर्यटकांवर दहशतवाद्यांनी गोळीबार करून त्यांना ठार मारले. त्यांना ठार करण्यापूर्वी तुम्ही कोणत्या धर्माचे आहात हे विचारले, जे हिंदू धर्माचे होते त्यांना गोळ्या घालण्यात आल्या. विविध राज्यांमधून गेलेल्या पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेला हल्ला हा खरे तर भारताच्या विविधतेवर केलेला हल्ला आहे. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यांमुळे देशभरातून संतापाची लाट उसळली. या दहशतवाद्यांना कोण पाठिंबा देते, हे कुठून येतात हे आता मागील अनुभवातून सगळ्यांना माहीत झालेले आहे. त्यामुळे पाकिस्तानला या हल्ल्याबद्दल चांगला धडा शिकवावा, अशी भावना देशातून व्यक्त झाली. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तात्काळ उच्चस्तरीय बैठक घेतली आणि पाकिस्तानवर पाच निर्बंध घातले. त्यात एक आहे, भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांनी तात्काळ देश सोडावा. त्यानंतर भारतात जे पाकिस्तानी नागरिक आहेत, त्यांची शोधाशोध सुरू झाली. खरे तर भारतात पाकिस्तानी नागरिक कशाला येतील, असेच इथल्या सर्वसामान्य नागरिकाला वाटते. पण आता विविध राज्यांमधील पाकिस्तानी नागरिकांची संख्या पाहता आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही. ज्यावेळी केंद्र सरकारने नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) कायदा आणला तेव्हा शाहीन बाग आंदोलन का करण्यात आले असेल, हे आता लक्षात येऊ शकेल. कारण त्यामुळे जे पाकिस्तानातील मुसलमान इथे अनधिकृतपणे राहत आहेत, त्यांना बाहेर काढण्यात येणार होते. त्यांना आता पहलगामच्या हल्ल्यानंतर बाहेर काढण्यात येत आहे. त्यापूर्वी अनेक पाकिस्तानी रुग्णांवर भारतात मोफत किंवा माफक दरात गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या, पण त्यामुळे पाकिस्तानी राज्यकर्त्यांचे हृदय परिवर्तन झाले नाही हा भाग वेगळा. पण आता जेव्हा पाकिस्तानी नागरिकांना भारतातून बाहेर काढण्यात येत आहे, तेव्हा काही लोकांकडून मानवतावादी दृष्टिकोनातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. यात नागरिकांचा काय दोष, ते काही अतिरेकी नाहीत, असा व्युक्तिवाद करण्यात येत आहे. इतकेच नव्हे तर जे काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेले होते त्यांनीही स्थानिक मुसलमानांबद्दल आपली चांगली मते व्यक्त केली आहेत. काश्मीरमधील लोक चांगले आहेत, त्यांनी आमची चांगली काळजी घेतली, असे ते सांगत आहे. ही आनंदाची बाब आहे. अर्थात, या पर्यटकांकडून त्यांना पैसे मिळत असतात. काश्मीरमध्ये राहणारे सगळेच मुसलमान काही अतिरेकी नाहीत, हे बरोबर पण याच काश्मीरमध्ये राहणारे जे काश्मिरी पंडित होते, त्यांचे काय झाले, याचा विचार करताना फारसे कुणी दिसत नाही. काश्मीरमधील हिंदू पंडित जे भारताचे नागरिक असूनही त्यांच्यावर जीवघेणे हल्ले का झाले, ते घरांपासून पोरके का झाले? गेली ३० वर्षे ते भटकत आहेत. गेल्या तीस वर्षांत काश्मीरमध्ये किंवा केंद्रात सत्तेत आलेल्या सरकारांनी त्यांना मूळ घरांमध्ये पुन्हा स्थापित केले नाही. काश्मिरी पंडितांची मूळ घरे आहेत, तो काश्मीर काही भारतीय सीमेच्या बाहेर नाही, भारताकडे इतके मोठे सैन्य दल आणि शस्त्रास्त्र संपन्नता असतानाही कुठल्याच सरकारला पंडितांना आपल्या घरी परत जाण्याचा मार्ग सुकर का करता आला नाही, याचा विचार करायला आज कुणी तयार नाही. काश्मिरी पंडित दिल्लीतील जंतर मंतर येथे सातत्याने टाहो फोडत असतात, पण केंद्र आणि काश्मीरमधील राज्य सरकार त्यांच्यासाठी काही करत नाही. या काश्मिरी पंडितांना मोदींचे बहुमतातील सरकार केंद्रात आल्यानंतर आपल्याला आपल्या मूळ घरी जाता येईल, निर्भयपणे राहता येईल, असे वाटत होते, पण तेही झालेले नाही. मध्यंतरी काश्मीर फाईल्स नावाचा चित्रपट आला होता, त्यावेळी ठिकठिकाणी विपन्नावस्थेत राहणाऱ्या काश्मिरी पंडितांची विदारक स्थिती दिसून आली होती. १९९० च्या सुमारास काश्मीरमध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाने उचल खाल्ल्याने काश्मिरी पंडितांचा कत्तले आम सुरू झाला. त्यांना त्यांच्या घरांमधून हाकलून देण्यात आले. जेव्हा १९४७ साली भारताची फाळणी झाली तेव्हाही पाकिस्तानातील हिंदूंच्या अशाच कत्तली उडवण्यात आल्या होत्या. त्यांनी आपली घरे सोडून भारत गाठला होता. ही १९४७ ची गोष्ट होती, देश स्वतंत्र झाल्यानंतर जेव्हा काश्मीर भारताचा भाग होता, भारताकडे मोठे लष्कर होते, त्यावेळी १९९० च्या सुमारास याच देशातील नागरिकांना त्यांचीच घरेदारे सोडून जीवानिशी पळावे लागले, याला काय म्हणावे. भारतीय संसदेत वक्फ कायदा मंजूर झाला त्याच्या निषेधार्थ देशात काही ठिकाणी आंदोलने सुरू आहेत. पश्चिम बंगालमध्ये याचा जास्त जोर आहे. पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद आणि परिसरात राहणाऱ्या हिंदूंवर मुसलमानांनी हल्ले केले, त्यांची घरे सोडून त्यांना पळावे लागले. भारताच्या सीमेत असलेल्या भागात राहणाऱ्या हिंदूंची जर स्वतंत्र भारतात ही अवस्था होत असेल तर जे पाकिस्तान आणि बांगलादेशमध्ये बिगरमुस्लीम राहतात, त्यांना जीव मुठीत घेऊन कसे जागावे लागत असेल याची कल्पना केलेली बरी. पाकिस्तानमधून तर आता बहुतेक हिंदू साफ झालेले आहेत. बांगलादेशमध्ये त्यांच्यावर होत असलेले हल्ले भारत हतबलपणे पाहत आहे, आणि भारतामध्ये दीड कोटी बांगलादेशी पोट भरायला राहत आहेत. याला काय म्हणावे?

**तीन महिने उलटून गेले तरी रायगडसह नाशिक जिल्ह्याला अजून पालकमंत्री मिळालेले नाहीत. ज्या जिल्ह्यांना पालकमंत्री नसतो त्यांची जबाबदारी मुख्यमंत्र्यांकडे असते, असे वक्तव्य तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. मात्र, पालकमंत्री कधी मिळणार, यावर ठोस बोलणे त्यांनी टाळले होते. रायगडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या अदिती तटकरे आणि शिवसेनेचे भरत गोगावले यांच्यात पालकमंत्रीपदासाठी चढाओढ सुरू आहे. तर नाशिकमध्ये भाजपचे गिरीष महाजन आणि शिवसेनेचे दादा भुसे यांच्यात स्पर्धा आहे. रायगडमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरू असून भाजप ही हमरीतुमरी शांतपणे पाहत आहे.**





# रायगड, नाशिकला पालकमंत्री कधी मिळणार?

रायगड जिल्ह्याला खरेच पालकमंत्री मिळणार आहे का, या प्रश्नाकडे कुणीही फारसे गांभीर्याने पाहात नाही. मात्र, कोणत्या पक्षाचा पालकमंत्री होणार, हा सर्व राजकीय पक्षांसाठी कळीचा मुद्दा आहे. तीन महिन्यांपासून काथ्याकूट सुरू आहे, तरीही रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा तिढा सोडवता येत नसेल तर महायुतीत ऑल इज वेल नाही, हे स्पष्ट होते. आम्ही तिघे एकत्र आहोत, आमच्यात मतभेद नाहीत, आमचे डबल इंजिनचे सरकार आहे, अशी कितीही वक्तव्ये केली वास्तव सर्वांच्या समोर आहे. रायगडच्या पालकमंत्रीपदावरून वाद विकोपाला पोहोचला आहे, कुणीही माघार घ्यायला तयार नाही, हे रायगडच्या जनतेला दिसणारे चित्र आहे. त्यामुळे रायगडमध्ये नक्की काय सुरू आहे, अमित शहांसोबतची लंच डिप्लोमसी कधी फळास येणार, अशीही चर्चा आहे. सुतारवाडीतील लंच डिप्लोमसीलाही दोन आठवडे होऊन गेले. पालकमंत्रीपदाचा निर्णय होत नाही, त्यामुळे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अस्वस्थता आहे. विशेष दोन्ही पक्षांचे प्रमुख एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावर काहीच बोलत नाहीत. तर मंत्री भरत गोगावले, महेंद्र थोरवे आणि महेंद्र दळवी या शिवसेनेच्या आमदारांसमोर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे एकटे उभे ठाकले आहेत. तीन महिन्यांपासून त्यांच्यात चढाओढ सुरू आहे, दोन्ही पक्षांतील वाद विकोपाला गेला आहेत. तरीही पालकमंत्री ठरत नाही, ही बाब महायुतीतील पक्षांसाठी साजेशी नाही, एवढे मात्र खरे.

यंदा १८ जानेवारी रोजी मुख्यमंत्र्यांनी पालकमंत्रीपदाची यादी जाहीर केली. आता मुख्यमंत्र्यांनी यादी जाहीर केली म्हणजे अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करूनच केली असणार, हे उघड आहे. असे असताना रायगडच्या पालकमंत्रीपदी अदिती तटकरे आणि नाशिकच्या पालकमंत्रीपदी गिरीष महाजन यांची नियुक्ती झाल्यानंतर शिवसेनेकडून जोरदार विरोध करण्यात आला. रायगड जिल्ह्यात तर त्याच रात्री शिवसेनेकडून प्रचंड संताप व्यक्त करण्यात आला. मंत्री भरत गोगावले यांच्या समर्थकांनी चक्क मुंबई-गोवा महामार्गावर आंदोलन केले. रात्रीच्या सुमारास केलेल्या आंदोलनामुळे प्रवाशांचे अनेक तास हाल झाले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्योग-गुंतवणुकीसाठी दावोसला गेले होते. मात्र, शिवसेनेतून झालेला प्रखर विरोध लक्षात घेऊन त्यांनी दुसऱ्याच दिवशी (१९ जानेवारी) रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रीपदाला स्थगिती दिली ती अजूनपर्यंत कायम आहे. रायगड जिल्ह्यातील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते म्हणून भरत गोगावले यांचा पालकमंत्रीपदावर दावा आहे. ते सलग चौथ्यांदा आमदार झाले आहेत. शिवाय जिल्ह्यातील सातपैकी तीन आमदार शिवसेनेचे आहेत. आणि याआधीही रायगडमध्ये शिवसेनेचे तीन आमदार होते आणि तेव्हाही शिवसेनेचाच पालकमंत्री होता. त्यामुळे आताही शिवसेनेचाच पालकमंत्री असावा, असा शिवसेनेचा हट्ट आहे. असे असताना जिल्ह्यात केवळ एक आमदार असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि तेही अदिती तटकरे यांना पालकमंत्रीपद मिळाल्यामुळे शिवसेनेतून कडक विरोध करण्यात आला होता. विशेष म्हणजे शिवसेना आणि तटकरे यांच्यातील रायगडमधील वाद काही जुना नाही. अगदी विधानसभा निवडणुकीच्या आधीही कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी तटकरेंना अनेकदा लक्ष्य केले होते. आणि विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होताच आमदार थोरवे यांनी अदिती तटकरे यांना पालकमंत्रीपद देण्यास जाहीर विरोध केला होता. त्यामुळे या वादावर तोडगा निघण्याऐवजी तो दिवसेंदिवस चिघळत गेला.

रायगडमधील पालकमंत्रीपदाच्या वादावर भाजप तोडगा काढण्यास इच्छुक नसल्याचे अनेकवेळा जाणवले. रायगडमध्ये जसे शिवसेनेचे तीन आमदार आहेत तसेच भाजपचेही तीन आमदार आहेत. मुख्यमंत्र्यांनी पालकमंत्र्यांची नियुक्ती केली तेव्हा ज्या जिल्ह्यात पालकमंत्री नाहीत त्या जिल्ह्यांमध्ये भाजपने संपर्कमंत्री नियुक्त केले आहेत. भाजपचे रायगडचे संपर्कमंत्री आशिष शेलार आहेत. म्हणजेच प्रशांत ठाकूर (पनवेल), महेश बालदी (उरण), रवींद्र पाटील (पेण) हे भाजपचे तीन आमदार, शिवाय पनवेलचे विक्रांत पाटील हे विधान परिषदेचे सदस्य आणि पेणमधील धैर्यशील पाटील यांना भाजपने राज्यसभेवर पाठवून भाजपने रायगडमधील ताकद वाढवली आहे. हे कमी म्हणून की काय अलीकडेच शेकापचे माजी आमदार सुभाष ऊर्फ पंडित पाटील आणि दिवंगत मंत्री मीनाक्षी पाटील यांचे पुत्र ॲड. आस्वाद पाटील यांना भाजपमध्ये प्रवेश देत भाजपने अलिबाग तालुक्यात भाजपची मुळे घट्ट करण्याचा जोरदार प्रयत्न केला आहे. या शिवाय भाजपचे विधान परिषदेतील गटनेते कायम महाड-पोलादपूरचा दौरा करत असतात. म्हणजेच शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात पालकमंत्रीपदावरून चढाओढ सुरू असताना भाजपने रायगडमधील बळ वाढवण्यावर भर दिला आहे.

रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रीपदाला स्थगिती दिल्यानंतर रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी अनेकदा दोन दिवस थांबा, चार दिवसांत निर्णय होईल, लवकर निर्णय होईल, अशी वक्तव्ये केली होती. मात्र, तीन महिने होऊन गेलेत तरीही मुख्यमंत्री निर्णय घेत नाहीत. याचाच अर्थ शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पालकमंत्रीपदावरून पाऊल मागे घेण्यास तयार नाहीत. जिल्ह्याला पालकमंत्री नसणे हे जिल्ह्याच्या विकासाला मारक आहे. अलीकडेच १२ एप्रिल रोजी किल्ले रायगडावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आले होते. त्यावेळी ते तटकरे यांच्या आमंत्रणावरून सुतारवाडीत जेवायला गेले होते. ही तटकरे यांची लंच डिप्लोमसी असल्याची चर्चा होती. मात्र, राजकीय चर्चा अशा गर्दी-गदारोळात होत नाहीत, हे सर्वांना ठावूक आहे. अमित शहांच्या दौऱ्याला दोन आठवडे होऊन गेलेत. त्यानंतरही पालकमंत्री कोणत्या पक्षाचा होणार, हे अजून ठरलेले नाही. हे आणखी किती दिवस चालणार, याची कुणालाही कल्पना नाही. त्यामुळे रायगड जिल्ह्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील वाद कायम चव्हाट्यावर दिसतो.

दोन्ही पक्षांच्या नेत्यांकडून एकमेकांना टोले लगावले जात आहेत आणि त्यांचे समर्थक टाळ्या वाजवत आहेत, हे दृश्य रायगडमध्ये सर्रास झाले आहे. नाशिकमधील चित्र काही वेगळे नाही. तिथे गिरीष महाजन यांना सिंहस्थ मंत्री करून भाजपने बाजी मारली आहे. आता पालकमंत्री कधी नियुक्त होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, पालकमंत्रीपदाच्या वादात नाशिकमध्ये गेलेल्या मुख्यमंत्र्यांनी दीड-दोन महिन्यांपूर्वी एक महत्त्वाचे विधान केले होते. ज्या जिल्ह्यांना मुख्यमंत्री नसतो, त्याची जबाबदारी थेट मुख्यमंत्र्यांकडे असते. म्हणजे सध्या नाशिकचे पालकमंत्री मुख्यमंत्री आहेत. हीच बाब रायगडला लागू झाली असेल तर शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या वादात मुख्यमंत्री फडणवीस पालकमंत्री म्हणून जबाबदारी निभावतील. मध्यंतरी रायगडमधील एक बैठक उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या अधिकारात घेतली होती. त्यावेळी बराच गोंधळ झाला होता. असो, आता फार काळ या वादाचे घोंगडे भिजत ठेवण्यात अर्थ नाही. त्यामुळे महायुतीतील वादाचे जाहीर प्रदर्शन घडत आहे. महायुती म्हणून आपण एकत्र आहोत असे सांगत असताना याला रायगडमध्ये छेद मिळत आहे, याची जाणीव तिन्ही नेत्यांना होत असेल तर पालकमंत्रीपदाच्या वादावर तातडीने तोडगा काढून आम्ही सत्तेसाठी नाही तर जनतेच्या सेवेसाठी सत्तेत आहोत, हे सांगण्याचा अधिकार त्यांना प्राप्त होईल.

## 'नीलक्रांती'ला बळ

महाराष्ट्राच्या अंगणातील तब्बल ७२० किमी लांबीचा समुद्रकिनारा हे खरे तर राज्यासाठी मोठे धन; पण असा विचार धोरणकर्त्यांनी अपवादानेच केल्याचे दिसते. मग ती मासेमारी असो की पर्यटन. पण मत्स्योद्योग मंत्रालयाचा ताजा निर्णय याला अपवाद ठरला. या विभागाचे मंत्री नीतेश राणे यांनी राज्यातील मासेमारी व्यवसायाला कृषी दर्जा देण्याचे जाहीर केले. सुमारे पाच लाख मच्छिमारांसाठी हा मोठाच दिलासा आहे. बदललेले हवामानचक्र, मासेमारीच्या मुळावर येणारी विकासकामे, समुद्राचा तळ खरवडणाऱ्या यांत्रिक बोटी, पर्ससीन जाळ्यांचा वापर आणि माशांच्या प्रजननचक्राला न जुमानता बाराही महिने होणारी बेछूट मासेमारी यामुळे राज्यातील मासेमारी धोक्यात आली असून बोटी आणि जाळ्यांसाठी घेतलेल्या कर्जाच्या ओझ्याखाली बहुतांश मच्छिमार आकंठ बुडाले आहेत. योजनेनुसार मासेमारांना शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व योजना आणि सवलती दिल्या जातील. वीजबिलात सवलत, किसान क्रेडिट कार्ड, बँकेची स्वस्त कर्ज आणि विमा, सवलतीत सौर ऊर्जा योजना यासाठी आता मच्छिमारही पात्र ठरतील. वीजबिलातील सवलतींसाठी राज्याच्या तिजोरीतून ६९ कोटी खर्च होणार आहेत. किसान सन्मान योजनाही मच्छिमारांना लागू होईल. जिल्हा सहकारी बँकांकडूनही त्यांना आर्थिक मदत मिळू शकेल. खरे तर ही योजना अन्य राज्यांमध्ये प्रचंड यशस्वी ठरली आहे. आंध्र, छत्तीसगड, झारखंड, बिहार, कर्नाटक या राज्यांनी कृषी क्षेत्रासारख्या सवलती दिल्यामुळे मत्स्योत्पादनात मोठी वाढ झाली आहे. सध्या राज्य सागरी मासेमारीत सहाव्या, तर गोड्या पाण्यातील मासेमारीत १७व्या क्रमांकावर आहे. या सवलतींमधून कदाचित हे क्रमांक वरच्या दिशेने सरकू शकतील. मत्स्योत्पादन वाढले की या क्षेत्रातील रोजगारही वाढतील. वादळे मच्छिमारांना नवी नाहीत, पण हवामानबदलामुळे त्यांची वारंवारिता वाढली आहे.

# अंधश्रद्धांत अडकविलेले पक्षी

**अंधश्रद्धा आणि पक्ष्यांशी संबंधित मिथकांवर प्रकाश टाकणारा हा लेख विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन उभारण्याचा प्रयत्न करतो. विशेषत: घुबडासंबंधी असलेल्या अंधश्रद्धांमुळे त्याची होणारी शिकार, धार्मिक गैरसमज आणि त्याच्या जैवमहत्त्वावर झालेले दुर्लक्ष याचे वास्तव या लेखात स्पष्ट केले आहे.**

उत्क्रांतीदरम्यान मानवी जीवनात अनेक दंतकथा, पौराणिक कथा, अंधश्रद्धा वगैरेंची निर्मिती झाली. त्यामध्ये सुरुवातीस विविध गोष्टींचे अज्ञान, आकलन, बाल्यावस्थेत असणारी तार्किकता इत्यादी कारणे होती. त्यामुळे आंधळा विश्वास हा जगातील सर्वच संस्कृतीचा भाग बनल्याचे दिसते. पण जसजशी बुद्धिमत्ता, विचारशक्ती विकसित होत गेली व वैज्ञानिक दृष्टिकोन वर्धिष्णू होत चालला तसतशी ही अंधश्रद्धा कमी व्हायला हवी होती. पण या अंधश्रद्धांचा लोकांवर फारमोठा पगडा असल्याने त्या फारशा कमी होताना दिसत नाहीत. बऱ्याच अंधश्रद्धांत आर्थिक स्वार्थ असल्याने त्या मुद्दाम पसरविल्या जातात. अंधश्रद्धाळू सारासार विचारशक्ती हरवून बसले असल्याने त्यांना ते बळी पडतात. अंधश्रद्धेत शकून-अपशकुनांचा फारमोठा बोलबाला असतो. यात गमतीचा भाग असा की, वेगवेगळ्या समाजात, जातीत, देश-प्रदेशात, परंपरांत त्याचा अर्थ वेगवेगळा लावला जाताना दिसतो. याशिवाय काही अंधश्रद्धा या वैयक्तिक असतात. म्हणजे, एखाद्याला अशी एखादी श्रद्धा चांगल्या शकुनाची वाटते तर दुसऱ्याला तीच अपशकुनी वाटते.

माणसाने या अंधश्रद्धांत अनेक प्राण्यांना अडकविले आहेत आणि यात सर्वांत सामान्य प्राणी म्हणजे पक्षी होय. पक्ष्यांचे उंच आकाशात उडणे हा आदिमानवाचा निश्चितच कुतूहलाचा, आश्चर्याचा आणि गूढ असा भाग असल्याने, देवाचे दूत, प्रतिनिधी किंवा प्रसंगी परमेश्वराचा अवतारच म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाई. त्यामुळे पक्ष्यांविषयी अनेक विलक्षण मिथकांची, काल्पनिक गोष्टीची निर्मिती झाली ज्यात जीवन, मृत्यू, नशीब, प्रेम इत्यादी भावना निगडित असतात. देवाकडून पक्षी शकून-अपशकुन, आशा असे संदेश घेऊन येतात अशी पक्की धारणा त्यात असे.

जगातील अनेक संस्कृतीमध्ये पक्षी केंद्रित अंधश्रद्धा आढळतात. आजही, प्रगत वैज्ञानिक



युगातही, त्या बऱ्याच प्रमाणात प्रचलित आहेत. घुबड, पिंगळा, टिटवी, निळकंठ, धनेश, कावळा, चकोर, भारद्वाज, सुतार इत्यादी अनेक पक्ष्यांविषयी विविध अंधश्रद्धा आढळतात.

घुबड - या पक्ष्याविषयी मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा आहेत. घुबडाची शारीरिक वैशिष्ट्ये, त्याचा वावर, वसतिस्थान, आवाज, भय उत्पन्न करतात. सर्वसाधारणपणे मोठी झाडे असलेली स्मशाने, पडके वाडे अशा ठिकाणी ते राहतात. त्यांचे डोळे मानवाप्रमाणे पुढच्या बाजूस असून ते सामान्यतः पिवळेजर्द किंवा लालबुंद असतात. हे डोळे हलू शकत नाहीत. त्यामुळे आजूबाजूला व मागे पाहण्यासाठी त्याची मान २७० अंशातून गरकन् फिरू शकते. उडताना पिसांचा आवाज होत नसल्याने, एकदम तो समोर आलेला कळतही नाही. तर निशाचर असल्याने रात्रीचा अंधार चिरत जाणारा त्याचा आवाज ऐकला की, अनेकांची गाळण उडते. अशा त्याच्या अनेक वैशिष्ट्यांमुळे घुबडाचे नाव काढले तरी लोक घाबरतात. अनेक अंधश्रद्धांची निर्मिती त्यामुळेच झाली आहे. पर्यावरणाचे आरोग्य आणि जैवविविधतेचे उत्कृष्ट जैवसूचक असलेल्या घुबडास निराधार मिथकात/अंधश्रद्धेत अडकवून अनादी काळापासून त्याची प्रतिष्ठा मलिन केली गेली आहे. आता त्याच्याविषयीच्या काही अंधश्रद्धा-घरावर बसलेले घुबड अशुभ असते. यामुळे घरातील कुटुंबावर संकट येते, प्रसंगी कोणाचा तरी मृत्यू होतो. वास्तविक, स्मशानातील मोठी झाडे व त्यांच्या ढोली यामध्ये सामान्यपणे घुबडे राहतात. अंत्यविधीच्या वेळी स्मशानात गेलेल्या लोकांना ती दिसू लागल्याने मृत्यू व घुबड असा गैरसंबंध जोडला गेला असावा. भारतात घुबडाकडे दुहेरी भूमिकेतून पाहिले जाते, ते अंधश्रद्धा व हिंदू धार्मिक श्रद्धांचा खोलवर रुजलेल्या ठशामुळे. म्हणजे घुबडास एका बाजूला त्याच्या रूप, आवाज इत्यादींमुळे अशुभ मानतात, तर दुसऱ्या बाजूला त्याचे दर्शन शुभ असल्याचा निर्वाळा धर्मशास्त्री देतात.

धर्मग्रंथानुसार, घुबड हे लक्ष्मीचे वाहन आहे. एवढे बळकट अन् महत्त्वाचे सांस्कृतिक महत्त्व असले, तरी दिवाळीत धनलक्ष्मी पूजनाच्या वेळी घुबडांची प्रचंड प्रमाणात हत्या होते, कारण लक्ष्मीचे वाहन जर नसेल परत जायला, तर लक्ष्मी आपल्या घरातच कायम राहील. अशा अंधश्रद्धांमुळे घुबडांची संख्या वेगाने कमी होत आहे. दिवाळीच्या वेळेस एक घुबड हजारपासून लाखापर्यंत विकले जाते.

काळ्या जादूमध्येही घुबडांच्या शरीरातील विविध अवयवांचा (डोळे, पंख, कवटी, यकृत, हृदय, रक्त, चोच, मांस, हाडे, अंडी) इत्यादींचा औषध म्हणून वापर केला जातो. तसेच पिसे आणि नखे तावीज म्हणून वापरतात, पण या सर्व गैरसमजुती आहेत. कारण त्या सिद्ध झालेल्या नाहीत.

चांगली दृष्टी - आणखी एक अंधश्रद्धा म्हणजे घुबडाचे डोळे खाल्ल्याने (भारतात), तर त्याचे अंडे खाल्ल्याने (इंग्लंडमध्ये) असे मानतात की, आपली दृष्टी तीक्ष्ण होते.

घुबड - म्हणजे भूत किंवा पिशाच असावे अशी एक गैरसमजूत सर्वत्र आढळते. याचा उगम त्याचे माणसाप्रमाणे पुढे असणारे डोळे पाहून व सायंप्रकाश किंवा चंद्रप्रकाशात चेहरा इकडेतिकडे हलताना पाहून आणि भर्रकन उडून जात असल्याने पूर्वजांना ते भूत वाटले असणार आहे. घुबडाच्या बाबतीत शकून शास्त्रातील तऱ्हेवाईकपणा असा की प्रवासाला जाताना जर ते दिसलं तर शुभ व धनलाभही होतो, पण तेच जर आपल्या घरावर किंवा घरात आले तर मात्र हानिकारक असते हे वर पाहिलेच आहे. आपण घुबडाला दगड मारू नये. कारण, ते मारलेला दगड घेऊन नदीवर जाते अन् त्यास घासू लागते. जसजसे दगडाची झीज होईल तसतशी दगड मारणाऱ्याची प्रकृती क्षीण होत जाते व तो मरण पावतो ही दंतकथा तर लहानपणी प्रत्येकाने ऐकली असेल. अर्थात, ही अंधश्रद्धा जरी असली, तरी घुबडाला अभय देणारी आहे. म्हणून ती पर्यावरणाच्या दृष्टीने चांगली आहे. उंदीर मारून तो खूप मोठ्या प्रमाणावर धान्य नासाडी टाळतो व किडे खाऊन कीड नियंत्रणही करीत असतो.

**मुंबई उपनगरीय रेल्वे सेवेत २०१७ पासून सुरू झालेल्या वातानुकूलित लोकलना सुरुवातीला तिकीटदरांमुळे अल्प प्रतिसाद मिळाला. तिकीटदर कमी केल्यावर प्रवासी वाढले; मात्र सामान्य लोकल कमी करून एसी लोकल वाढवल्यामुळे मध्यमवर्गीय व गरीब प्रवाशांना अधिक गर्दीत प्रवास करावा लागतो. गर्दीच्या वेळी सामान्य लोकल चालण्याऐवजी वातानुकूलित लोकल चालविण्यात येत असल्याने गर्दीमध्ये अधिकच वाढ होऊन प्रवाशांची गैरसोय होऊ लागली आहे.**






# श्रीमंतांची लोकल

भारतातील सर्वात पहिली रेल्वे बोरीबंदर ते ठाणे स्थानकादरम्यान १६ एप्रिल १८५३ धावली. यानंतर हळूहळू उपनगरीय लोकल सेवेमध्ये विविध तांत्रिक बदल झाले. आज पश्चिम आणि मध्य रेल्वेच्या मुख्य रेल्वे मार्गावर वातानुकूलित लोकल चालविण्यात येत आहेत. २०१७ पासून वातानुकूलित लोकल उपनगरीय सेवेत दाखल झाली. मध्यम आणि श्रीमंत वर्गालाही तिकीट दर परवडत नसल्याने या लोकल रिकाम्या चालत होत्या. प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी वातानुकूलित लोकलचे तिकीट दर कमी करण्यात आले. त्यामुळे वातानुकूलित लोकलला प्रवाशांकडून प्रतिसाद वाढला आहे. परंतु वातानुकूलित लोकलचे तिकीट किंवा पास मध्यमवर्गीय आणि गोरगरीबांच्या आवाक्याबाहेर असल्याने त्यांना सामान्य लोकलमधून प्रवास करावा लागत आहे. मध्य रेल्वेवरून सध्या ८० वातानुकूलित लोकल सेवा चालविण्यात येत आहेत, तर सामान्य उपनगरी लोकलच्या १ हजार ८१० सेवा चालविण्यात येतात. यामधून मध्य रेल्वेवरून दरदिवशी ३९ लाख प्रवासी प्रवास करतात, तर वातानुकूलित लोकलमधून सुमारे ८४ हजार प्रवासी प्रवास करतात. पश्चिम रेल्वे मार्गावर १ हजार ४०६ लोकल फेऱ्या चालविण्यात येतात. यामधून तब्बल ३० लाख प्रवासी प्रवास करतात, तर १०९ वातानुकूलित लोकलमधून दरदिवशी १ लाख २६ हजार प्रवासी प्रवास करतात. गर्दीच्या वेळी वातानुकूलित लोकलमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे. मात्र ऐन गर्दीच्या वेळी सामान्य लोकल चालण्याऐवजी वातानुकूलित लोकल चालविण्यात येत असल्याने गर्दीमध्ये अधिकच वाढ होऊन प्रवाशांची गैरसोय होऊ लागली आहे. लोकलमधून पडून होणाऱ्या अपघातांमध्ये अनेकांना जीव गमवावा लागतो. मात्र वातानुकूलित लोकलचे दरवाजे बंद होत असल्याने वातानुकूलित लोकल उपयुक्त ठरत आहे. मात्र गर्दीच्या वेळी चालविण्यात येणाऱ्या वातानुकूलित लोकल सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी झाल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना गर्दीतून प्रवास करावा लागत असून गाडीत प्रवेश मिळत नसल्याने प्रवाशांना दरवाजाला लटकून प्रवास करावा लागत आहे. वातानुकूलित लोकलची संख्या अशीच वाढत गेल्यास गर्दीमुळे लोकलमधून पडून होणाऱ्या मृत्यूंचा प्रश्न पुन्हा निर्माण होऊ शकतो. वर्षभरात वातानुकूलित लोकलच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय रेल्वे मंत्र्यांनी जाहीर केला आहे. यासाठी निधीची तरतूदही करण्यात आली आहे. त्यानुसार उपनगरीय मार्गावर वातानुकूलित लोकलची संख्या वाढणार आहे. यामुळे वातानुकूलित लोकलने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळेल. परंतु अनेक सध्या लोकलने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची आणखी कोंडी होणार आहे. पश्चिम रेल्वेच्या वांद्रे स्थानकात चर्चगेटला जाणाऱ्या तीन वातानुकूलित जलद लोकल एकापाठोपाठ आल्या. यामुळे सर्वसाधारण लोकलने प्रवेश करणाऱ्या प्रवाशाने सोशल मीडियावर नाराजी व्यक्त केली. 'ही सर्वसामान्यांसाठी धोक्याची घंटा' असल्याचे मत प्रवीण मसुरकर या प्रवाशाने सोशल मीडियावर व्यक्त केले आहे. वाढत्या वातानुकूलित लोकल फेऱ्यांना प्रवासी संघटनांकडूनही विरोध होत आहे. वातानुकूलित लोकलची संख्या वाढल्यास सामान्य लोकलमध्ये गर्दी वाढून चालत्या लोकलमधून पडून अपघात होऊ शकतो. यामुळे सामान्य लोकल आणि वातानुकूलित लोकल असा नवा वाद प्रवाशांमध्ये निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. हातावर पोट असलेले लाखो गोरगरीब लोकांना वातानुकूलित लोकलचा प्रवास खिशाला परवडणारा नसल्याने त्यांना लोकलची प्रतीक्षा करत गर्दीतून प्रवास करण्याची वेळ येणार आहे. सामान्य लोकल प्रथम दर्जा, सामान्य डब्बे आणि महिला डब्बे अशी एकत्रित सर्वांना सामावून घेणारी आहे. परंतु वातानुकूलित लोकल ही केवळ एकाच दर्जाचे तिकीट घेणाऱ्या प्रवाशांसाठी धावते. वातानुकूलित लोकलमधून केवळ श्रीमंत लोकच प्रवास करू शकत असल्याने रेल्वे गरीब आणि श्रीमंत प्रवासी अशी दरी निर्माण करत आहे. यावरून दोन्ही दर्जाच्या प्रवाशांमध्ये वाद निर्माण होऊ शकतात. रेल्वे श्रीमंतांची सोय करू पाहत असतानाच गरीबांसाठी लोकल फेऱ्या वाढविण्याबाबत गंभीर दिसत नाही. पोटापाण्यासाठी विरार, कर्जत-कसारा, पनवेल आदी भागातून मुंबईत येणारा कामगार वर्ग अग्निदिव्य करत रेल्वे प्रवास करत आहे. यामध्येच उशिराने धावणाऱ्या लोकलमुळे प्रवासी त्रस्त झाले असतानाच त्यांना कोणीही वाली उरला नसल्याचे दिसते. प्रवाशांची गैरसोय दूर करण्याकडे रेल्वे प्रशासन लक्ष देण्यास तयार नाही. याबाबत उच्च न्यायालयाने रेल्वेच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे. यानंतरही लोकलच्या गोंधळात सुधारणा झालेली नाही. प्रवाशांची गरज ओळखून लोकल फेऱ्या वाढविण्यासाठी योग्य नियोजन करण्यात रेल्वेला यश आलेले नाही. यामुळे लोकल गर्दीने तुडुंब भरून वाहत आहेत. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्रातील बहुतांश लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. वाढत्या महागाईमुळे अनेकांना संसाराचा गाडा चालविणे कठीण बनले आहे. त्यामुळे लोकल प्रवास करणारे लाखो लोक दरदिवशी पाच ते दहा रुपयांचे तिकीट न काढता विनातिकीट प्रवास करत आहेत. विनातिकीट प्रवाशांना रोखण्यासाठी रेल्वे विविध मोहिमा राबवत असून, त्या अपयशी ठरत आहेत. वातानुकूलित लोकलमधूनही विनातिकीट प्रवास करणाऱ्यांची संख्या अधिक आहे. विनातिकीट प्रवाशांना रोखण्यात रेल्वेला यश आलेले नाही. सामान्य लोकल रद्द करून त्याठिकाणी वातानुकूलित लोकल चालविण्यात येत आहेत. यामुळे सामान्य लोकलमधून अधिक चेंगराचेंगरीच्या अवस्थेत प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास अधिकच जिकरीचा झाला आहे. आज वातानुकूलित लोकलने प्रवास करणारे प्रवासी सुपात आहेत. त्यांनाही कधीतरी जात्यात जावे लागणार आहे, तर आधीच जात्यात असलेले सामान्य लोकलचे प्रवासी वातानुकूलित लोकलच्या वाढत्या संख्येमुळे अधिकच भरडले जाणार आहेत.

# भरलेली सिमला मिरची

**साहित्य –** २ वाट्या मक्याचे दाणे, १/२ चमचा जिरे पूड, पाव चमचा ओवा, १ चमचा लसूण-हिरवी मिरची पेस्ट, २ लहान चमचे दही, फोडणीसाठी तेल, जिरे, मोहरी, तिखट, मीठ, हळद, हिंग, ५-६ लहान आकाराची सिमला मिरची.

**कृती :** सर्वप्रथम मिरची भरलेल्या वांग्याप्रमाणे मधोमध कापून घ्या. बिया काढून घ्या. एका भांड्यात मक्याचे दाणे व मसाल्याचे सर्व साहित्य एकत्र करून तेलाचे मोहन घाला. मिरचीच्या बिया त्यातच घाला. थोडे दही घालून मिश्रण ओलसर करून घ्या. कढईत तेल, जिरे व मोहरी व हिंग घालून फोडणी करा व तेलावर मिरच्या पसरवा. मंद आचेवर मिरच्या लालसर होऊ द्या. बाजू उलटून घ्या. सर्व बाजूंनी मिरची लाल झाल्यावर गॅस बंद करा. झटपट भरलेली सिमला मिरची तयार होईल.



# वयाच्या पन्नाशीतही दिसा यंग आणि फिट

वयाला हरवणाऱ्या काही सोप्या उपायांमुळे आपण ५० वर्षांनंतरही फिट, यंग आणि निरोगी राहू शकता. वय वाढत असल्यामुळे काही त्रास उद्भवणे साहजिक आहे. काही पर्याय निवडून आपण आपला त्रास कमी करू शकता. जसे शॉपिंगसाठी इकडे-तिकडे भटकण्यापेक्षा ऑनलाइन शॉपिंग करा. या वयात सुंदर दिसण्याची आवडही कमी होत जाते, म्हणून अनेक महिला अजागळासारख्या राहतात. परंतु, हा लेख केवळ त्या महिलांसाठी आहे ज्या पन्नाशीतही तिशीत असल्यासारख्या दिसू इच्छितात. हे काही सोपे उपाय अमलात आणून आपण या वयातही फिट आणि यंग दिसू शकता.



▮ **खाद्यपदार्थांनी पोषण मिळवा, सप्लिमेंट्सने नव्हे :** ऑर्गेनिक फूड सेवन करा आणि प्रोसेस्ड फूड जसे ब्रेड, पास्ता आणि चीज खाणे टाळा.

▮ **सूप :** भूक भागण्यासाठी सूप प्या. या वयात नियमित भाज्यांचे सूप तयार करून पिणे सर्वोत्तम आहे.

▮ **रात्री हलके जेवा :** रात्री जेवण्याची मात्रा कमी ठेवा. रात्री जेवल्याबरोबर झोपणे टाळा. रात्री कोणत्याही प्रकाराचे स्नॅक्स घेणे टाळा.

▮ **त्वचेला उपयुक्त**



**आहार घ्या :** आपण जे काही खातो, त्याचा प्रभाव आपल्या शरीरावर होतो. म्हणून पोषक तत्त्वे आपल्याला निरोगी ठेवण्यात व सुंदरता वाढवण्यात मदत करतात.

▮ **प्रदूषणापासून दूर राहा :** स्वतः प्रदूषणमुक्त राहण्याचा प्रयत्न करा. घरातून बाहेर निघताना नाक मास्कने झाकून घ्या. सकाळी शुद्ध हवेत फिरा.

▮ **पायी फिरा :** दररोज अर्धा तास तरी पायी फिरा आणि सक्रिय राहा. एकाच जागी बसलात तर आपले पन्नाशीत फिट राहण्याचं स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही.

# झोप येत नसेल, तर हे करून बघा

योग आणि योगासनात बरीच क्षमता आहे. योग करा म्हणजे आजार होणार नाही. आजार गंभीर नसला तरीही योग प्रभावी असू शकतो. आज आम्ही इथे सांगणार आहोत की, रात्री झोप येत नसल्यास केले जाणारे फक्त दोन उपाय; ज्यामुळे आपल्याला शांत झोप येईल.

**झोप न येण्याची कारणं**

तसे तर झोप न येण्याची अनेक कारणे असू शकतात पण दोन कारणं प्रामुख्यानं असू शकतात जसे की शरीराला थकवा न जाणवणं आणि काळजी किंवा सतत दिवसं रात्र विचार करणं. हीच दोन प्रमुख कारणे आहेत म्हणून त्यासाठी येथे दोन उपाय सांगत

**प्राणायाम**

दररोज झोपण्यापूर्वी किमान ५ ते १० मिनिटे प्राणायाम करावा. आपण योगनिद्रेचा सरावदेखील करू शकता. यासाठी शवासनात झोपून शरीर, मन आणि मेंदूला सैल सोडा. डोक्यापासून पायापर्यंत आपल्या संपूर्ण शरीराला सैल सोडा. पूर्ण श्वास घेऊन सोडायचा आहे. आता असा विचार करा की, आपले हात, पाय, पोट, मान, डोळे सर्व काही सैल झाले आहेत. आता स्वतःला सांगा की, मी योगनिद्रेचा सराव करत आहे.

आता आपल्या मनाला शरीराच्या वेगवेगळ्या भागांकडे हलवा आणि त्यांना सैल आणि तणावरहित असण्याची सूचना द्या. आपल्या मनाला उजव्या पायाच्या अंगठ्यावर घेऊन जा. पायाची सर्व बोटे किमान तळपाय, टाच, पोटऱ्या, गुडघा, मांडी, नितंब, कंबर, खांदा सैलसर होत आहे. अशा प्रकारे डावा पाय देखील सैल सोडा. श्वास घ्या आणि सोडा.

आता झोपल्या झोपल्या ५ वेळा पूर्ण श्वास घ्या आणि सोडा. पोट आणि छाती वर-खाली होणार. पोट वर-खाली होणार. हा सराव दररोज करावा. यामुळे मन थकून झोपून जाणार आणि कोणत्याही प्रकारचा विचार करणार नाही.



**सूचना**

▮ दक्षिण दिशेला पाय करून झोपू नका.
▮ तामसी जेवण करू नका. रात्री हलकेच जेवण करावं.
▮ दिवसात किंवा दुपारी झोपण्याची सवय सोडून द्या.
▮ कोणत्याही प्रकारची नशा करू नका.
▮ झोपण्यापूर्वी आपली काळजी आणि विचारांना लांब ठेवून झोपा, कारण जेवढे महत्त्वाचे अन्न, पाणी आणि श्वास घेणे आहे, त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे झोप घेणे.
▮ रात्री उशिरापर्यंत जागणे आणि सकाळी उशिरा उठणे सोडा.
▮ झोपेची वेळ टाळल्याने झोप कमी होते.
▮ झोप बऱ्याच रोगांना स्वतःच ठीक करण्यास सक्षम असते.
▮ झोपेच्या अभावामुळे डोळ्याभोवती गडद वर्तुळे बनतात, तसेच डोळ्याभोवती काळपटपणा येतो.
▮ कमी झोपल्याने मेंदू थकलेला जाणवतो आणि वजनदेखील वाढते.

**सूर्यनमस्कार**

शरीराला थकवण्यासाठी झोपण्यापूर्वी १ तास व्यायाम करा किंवा फक्त १५ मिनिटांसाठी सूर्यनमस्कार करा. सूर्यनमस्कार १२ असतात. या सर्व १२ सूर्यनमस्काराची पुनरावृत्ती किमान १२ वेळा करा.

# गुगल क्रोम मराठीत कसं वापरायचं? जाणून घ्या सोपी पद्धत

जर तुम्ही गुगल क्रोम इंग्रजी व्यतिरिक्त मराठी व अन्य भाषांमध्ये देखील वापरता येतं. जाणून घ्या भाषा बदलण्याची सोपी गुगल क्रोम जगभरातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या वेब ब्राउजर पैकी एक आहे. लोक वेब ब्राउजिंगसाठी गुगल क्रोमला पसंती देतात कारण ह्याचा युजर इंटरफेस सोपा आहे. गुगल क्रोममध्ये अनेक असे फीचर्स आहेत जे उपयुक्त ठरतात. त्यात अनेक भाषांचा सपोर्ट देखील दिला जतो. गुगल क्रोम सुरुवातीपासून इंग्रजी भाषेत येतो पण ह्यात इतर भाषांचा सपोर्ट देखील आहे. जर तुम्हाला इंग्रजी भाषेत ब्राऊजर वापरायचं नसेल तर तुम्ही क्रोम मराठीसह अन्य स्थानिक भाषेत वापरू शकता.

गुगल क्रोम वर आपल्या आवडीची भाषा बदलणं खूप सोपं आहे. जर तुम्ही देखील इंग्रजी व्यतिरिक्त क्रोम इतर भाषेत वापरू इच्छित असाल तर हे आर्टिकल तुम्हाला उपयुक्त ठरेल. आज आम्ही तुम्हाला लॅपटॉप, कंप्यूटर, अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोमची भाषा बदलण्याची सोपी पद्धत सांगणार आहोत.

**पीसी वर क्रोम भाषा बदला**




- गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी तुम्हाला सर्वप्रथम आपल्या लॅपटॉप किंवा कंप्यूटरमध्ये गुगल क्रोम ओपन करावं लागेल.
- त्यानंतर लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यू ऑप्शनवर क्लिक करा आणि मग सेटिंग्स वर जा.
- इथे तुम्हाला लेफ्ट कॉर्नरवर Labguages चा ऑप्शन दिसेल.
- आता Add Languages वर क्लिक करा.
- Add Languages मध्ये तुम्हाला मराठीचा ऑप्शन दिसेल. तिथे क्लिक करून तुम्ही क्रोम मराठी व इतर भाषेत वापरू शकता.
- आता रिस्टार्टवर क्लिक करून गुगल क्रोम तुम्ही मराठी वापरू शकता.

**एंड्राइड वर क्रोम भाषा बदला**

- फोनवर गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी सर्वप्रथम तुमच्या अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोम ओपन करा.
- त्यानंतर टॉप-लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यूवर क्लिक करा.
- सेटिंगसमध्ये जाऊन Lanfguages वर जा.
- त्यानंतर गुगल क्रोम वर जाऊन मराठी भाषा निवडा.
- भाषा डाउनलोड झाल्यानंतर रिस्टार्टवर टॅप करा आणि मराठीत क्रोम वापरण्यास सुरुवात करा.

**नोटः** पुन्हा इंग्रजी भाषेत क्रोम वापरायचं असल्यास तुम्ही वरील प्रोसेस पुन्हा फॉलो करू शकता.

# आंघोळीच्या पाण्यात चिमुटभर मीठ मिसळण्याचे ४ आरोग्यदायी फायदे

**बदलत्या** वातावरणाचा परिणाम जसा थेट आरोग्यावर होतो तसाच तो त्वचेवरही होतो. ऋतूमानामध्ये बदल झाल्यानंतर त्वचाविकार जडण्याची शक्यता असते. त्वचाविकार हे काही काळापुरते वाढत असतात. अशावेळेस सुरूवातीच्या टप्प्यामध्ये अनेकदा लोकं आजाराकडे लक्ष देत नाही. जसाजसा त्रास वाढतो तसा त्रास अधिक गंभीर होऊ शकतो. म्हणूनच वेळीच या समस्येला रोखण्यासाठी पाण्यामध्ये चिमूटभर मीठ मिसळा.

## मीठ पाण्याने आंघोळ करण्याचे फायदे –

- स्कीन इन्फेक्शनचा धोका टाळण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात मीठ मिसळणं फायदेशीर आहे. या पाण्याच्या आंघोळीमुळे खाज येण्याच्या समस्येपासून सुटका मिळू शकते.
- त्वचेला तजेलदार ठेवण्याची क्षमता मीठाच्या पाण्यामध्ये आहे .कारण मीठ जंतूनाशक म्हणूनही काम करते.
- सांधेदुखीचा त्रास असणाया व्यक्तींना मीठाच्या पाण्याने आंघोळ करणं अधिक फायदेशीर आहे.
- कंबरेच्या दुखण्यावरही मीठाचे पाणी फायदेशीर आहे. मीठ आणि पाणी हे मिश्रण जसे जंतूनाशक असते तसेच दाहशामकदेखील आहे.

# चाकवतची पळीवाढी भाजी

**साहित्य :** चाकवतची मध्यम आकाराची जुडी १, बेसन/हरभरा डाळीचे पीठ/मूगडाळ पीठ - २ ते ३ टेबलस्पून, दही - ३ ते ४ टेबलस्पून, मीठ - चवीनुसार, साखर- दोन चिमूट, हळद व तिखट - रंग येण्यापुरते, अर्धी मूठ शेंगदाणे भिजवून (ऐच्छिक), २-३ चमचे हरभरा डाळ भिजवून (ऐच्छिक).

**फोडणीसाठी :** साजूक तूप - २ टेबलस्पून, जिरे, हिंग, हिरवी मिरची उभी चिरून - १.



**पाककृती :** चाकवताची चांगली पाने निवडून, स्वच्छ धुऊन कूकरला किंवा बाहेर पातेल्यात पाणी घेऊन उकडून घ्यावीत. भिजवलेले शेंगदाणे व हरभरा डाळ घालणार असाल तर तेही शिजवून घ्यावेत. शिजलेला पाला गार झाला की निथळून त्यात अनुक्रमे बेसन आणि दही घालून मिक्सरला एकजीव बारीक करून घ्यावे. मिक्सरला बारीक करणे नको असेल तर रवीने एकजीव घुसळून घ्यावे. गुठळ्या राहता कामा नयेत. शिजलेले शेंगदाणे, हरभरा डाळही घालावी. हे मिश्रण गॅसवर जाड बुडाच्या कढईत किंवा पातेल्यात गरम करायला ठेवावे. हवे तितके पाणी घालून आपल्याला हवे तसे सरसरीत करून घ्यावे. बेसन शिजल्यावर भाजीला दाटपणा येतो. त्या अंदाजाने पाणी घालावे. चवीनुसार मीठ, दोन चिमूट साखर, रंगापुरती किंचित हळद व तिखट घालून भाजीला एक उकळी आणावी. जास्त अजिबात उकळायचे नाही. फोडणीसाठी लोखंडी पळी गॅसवर तापत ठेवावी. त्यात साजूक तूप घालून ते जरा तापले की लगेच जिरे टाकावे, ते तडतडल्यावर हिंग व मिरची घालून गॅस बंद करावा. फोडणी जरा गार झाली की भाजीखालचा गॅस बंद करून त्यात पळी फोडणीसकट अलगद बुडवावी. चुर्र आवाज झाला पाहिजे. फोडणी पळीने भाजीत नीट मिसळावी. भाजी उकळल्यावर गॅस बंद करून भाजीवर झाकण ठेवावे व भाजी जरा मुरू द्यावी. गरमागरम किंवा गार भाजी पोळी/भाकरी/भात/ब्रेडसोबत खावी.



# ‘ई’ जीवनसत्त्व सुंदर त्वचेसाठी वरदान

मानसिक ताण, अपुरी झोप किंवा वाढते वय या पैकी कोणत्याही कारणांनी चेहऱ्यावर सुरकुत्या येऊ शकतात. त्वचा कोरडी पडत असली तरी सुरकुत्या येऊ लागतात. अश्या वेळी ‘ई’ जीवनसत्वाच्या कॅप्सूल मधील जेल नियमितपणे चेहऱ्यावर लावल्यास सुरकुत्या कमी होऊन कालांतराने नाहीशा होतात. रसायनयुक्त मेकअप वापरल्याने त्वचेमधील पेशींचे नुकसान होते. हे नुकसान ही ‘ई’ जीवनसत्वामुळे भरून निघण्यास मदत होते. तसेच ‘ई’ जीवनसत्व त्वचेला आर्द्रता देऊन त्वचेचा कोरडेपणा दूर करते.

‘ई’ जीवनसत्वाच्या वापराने त्वचेवर काही कारणाने आलेले व्रण किंवा ओरखडे लवकर भरून निघण्यास मदत होते. चेहऱ्यावरील व्रण किंवा डाग नाहीसे होण्याकरिता ‘ ई’ जीवनसत्वाची कॅप्सूल अर्धी कापून त्यातील जेल व्रणावर लावावे. हा उपाय दररोज करावा. काही दिवसांनंतर डाग हलके झालेले दिसून येतील. ‘ई’ जीवनसत्वामुळे त्वचेतील कोलाजेनमध्ये वाढ होऊन व्रण लवकर नाहीसे होतील.

काही व्यक्तींच्या चेहऱ्यावर पिग्मेंटेशनमुळे काळे डाग येतात. काहींच्या बाबतीत हे पिग्मेंटेशन फारच जास्त असते. ‘मेलानिन ‘हा घटक त्वचेला रंग देणारा आहे. हा घटक जेव्हा मोठ्या प्रमाणात त्वचेखाली एकाच ठिकाणी गोळा होतो, तेव्हा काळसर डाग आल्याप्रमाणे त्वचा दिसू लागते. अशा वेळी ‘ई’ जीवनसत्त्वातील जेल चेहऱ्यावर लावावे आणि त्याच्या जोडीने ‘ई’ जीवनसत्त्वाच्या कॅप्सूल्सचे सेवनही करावे. त्यामुळे हायपर पिग्मेंटेशन कमी होण्यास मदत होईल.

काही व्यक्तींचे हात, कितीही मॉईश्चरायझर लावले तरीही सतत कोरडेच पडत राहतात. तसेच थंडीच्या दिवसात ओठही फाटतात, टाचांना भेगा पडतात. या सगळ्यांवर उत्तम उपाय म्हणजे ‘ई’ जीवनसत्त्व. कॅप्सूलमधील जेल काढून घेऊन हातांना, ओठांना किंवा टाचांना लावल्यास कोरडेपणा दूर होण्यास मदत होते. तसेच सतत उन्हामध्ये वावरल्याने त्वचेला झालेले नुकसानही ‘ई’ जीवनसत्त्वाच्या वापरामुळे दूर होते.



केसांचे सौंदर्य आणि त्वचेचे तेज वाढवणाऱ्या पोषक द्रव्यांमध्ये ‘ई’ जीवनसत्त्व हे सर्वात महत्त्वाचे घटक आहे. यामध्ये त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे गुण असून, त्वचा सदैव तरुण आणि सुंदर दिसण्याकरिता आवश्यक पोषक घटक आहे. ‘ई’ जीवनसत्त्वाच्या कॅप्सूल्समधील जेल नियमित चेहऱ्यावर लावल्यास किंवा केसांना लावल्यास त्वचा आणि केस दोन्हीही सुंदर बनतात.



‘ई’ जीवनसत्त्व त्वचेप्रमाणेच केसांच्या सौंदर्याकरिताही फायदेशीर आहे. प्रदूषणाचे, तीव्र उन्हाचे दुष्परिणाम आपल्या त्वचेप्रमाणेच केसांवरही होत असतात. त्यामुळे केस रुक्ष होणे, डोक्यात सतत खाज सुटणे, कोंडा होणे आणि केसगळती या तक्रारी वारंवार सतावू लागतात. या तक्रारी दूर करण्याकरिता ‘ई’ जीवनसत्त्वाच्या कॅप्सूलमधील जेल खोबरेल तेलामध्ये मिसळून हे तेल केसांना मुळापासून टोकापर्यंत लावावे. आठवड्यातून दोन वेळा हा उपाय करावा. यामुळे केसांना आवश्यक पोषण मिळून केसांचा कोरडेपणा किंवा केसगळतीही कमी होईल.

# आवश्यक आहे मेकअप ब्रशची सफाई

रोज वापरण्यात येणाऱ्या मेकअप ब्रशची स्वच्छता करणेही आवश्यक आहे. यात जमणारे अंश स्किन आणि आय इन्फेक्शनसाठी कारणीभूत ठरू शकतात. जाणून घ्या काही टिप्स –



▮ मेकअप ब्रशमध्ये डस्ट, ऑईल आणि बॅक्टेरिया जमत असतात. म्हणून जितका ब्रशचा वापर असेल त्याप्रमाणे तो स्वच्छही केला गेला पाहिजे.

▮ एका बाऊलमध्ये दोन तृतीयांश पाणी आणि एक तृतीयांश व्हिनेगर टाकून ब्रश भिजवून ठेवा. काही वेळानंतर ब्रश पाण्यातून काढून स्वच्छ पाण्याने धुऊन टाका.

▮ आपण क्लिंजरने ब्रश स्वच्छ करू शकता. याने ब्रशची घाण बाहेर निघून जाते.

# स्तनदा स्त्रियांनी हे खाणे टाळावे...

आई होणे हे प्रत्येक स्त्रीसाठी आनंदाची बाब असते. गरोदरपणात तसेच आई झाल्यावर म्हणजेच बाळाच्या जन्मानंतर स्त्रीला पोषक तत्त्वांची कमतरता भासते. त्यासाठी तिने संतुलित आणि पौष्टिक आहाराचे सेवन केले पाहिजे. जेणेकरून तिचे आणि बाळाचे आरोग्य सुदृढ राहील. बाळ जन्माअगोदर आणि जन्मल्यानंतर पण आपल्या आईवरच निर्भर असतो. कारण आई जे काही खाते ते तिच्या बाळास मिळते. त्यासाठी तिने समतोल आणि सकस आहार घ्यायला हवा, जेणेकरून बाळास काही त्रास होऊ नये. तुमच्या खानपानामध्ये केलेल्या एका चुकीने ही बाळाच्या आरोग्यास हानी होऊ शकते.

आई बाळास स्तनपान करवते, त्यामुळे तिच्या दुधातून बाळाला आहार मिळत असतो आणि तेच त्याच्या वाढीस लाभकारी असते. आईने आपल्या आहारात अरबटचरबट पदार्थांचा समावेश केल्यास बाळास त्रास होऊ शकतो. स्तनपान करत असलेल्या स्त्रियांनी आपल्या आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश करायला नको ते जाणून घेऊ या...

■ आपल्या जेवणात उडीद डाळ किंवा त्यापासून बनवलेले पदार्थ खाणे टाळावे यामुळे पोटात गॅस होतो आणि त्यामुळे बाळास त्रास होऊ शकतो. बाळाचे पोट दुखू शकते.

■ साखरेपासून बनवलेल्या पदार्थांचा वापर कमी करावा. जास्त गोड खाण्याने बाळास भविष्यात मधुमेहाचा त्रास होण्याची दाट शक्यता असते.

■ बाहेरचे खाणे जसे चिप्स, शीतपेय, पिझ्झा, बर्गर खाणे टाळावे. बाळाला पोट दुखणे, हगवणीचा त्रास तसेच स्थूलपणाचा त्रास होऊ शकतो.

■ तेलकट पदार्थांचे सेवन करू नये. त्यामुळे बाळाच्या लिव्हरला त्रास होऊ शकतो. अपचन होऊ शकते.



# पाठवलेला ई-मेल पोहोचण्याच्या आधीच डिलीट कसा करायचा? समोरच्या व्यक्तीलाही कळणार नाही

**जीमेलवरून पाठवलेला ई-मेल अनसेंड करता येतो. जीमेलमध्ये हा पर्याय मिळतो आणि त्याची वेळ वाढवून तुम्ही रिसिव्हरच्या मेलबॉक्समध्ये गेलेला ई-मेल देखील मागे घेऊ शकता.**

व्हॉट्सअॅप आणि फेसबुक मेसेंजरसारखे ॲप्स येण्यापूर्वी ई-मेल्स खासगी तसेच बिझनेस कम्युनिकेशनचा महत्त्वाचा भाग होते. त्याव्यतिरिक्त ऑनलाइन कनेक्ट होण्याचा दुसरा पर्याय उपलब्ध नव्हता. आजही अनेक कॉर्पोरेट आणि गव्हर्नमेंट विभागदेखील ई-मेल कम्युनिकेशनचा वापर करतात. परंतु जर तुम्ही चुकीच्या ई-मेल ॲड्रेसवर ई-मेल पाठवला तर? किंवा पाठवलेल्या ई-मेलमध्ये चुका असतील तर? काळजी करू नका! आम्ही तुम्हाला असे उपाय सांगितले आहेत ज्यांच्या मदतीनं तुम्ही ई-मेल किंवा जीमेल मेसेज सहज अनसेंड करू शकता.

**अँड्रॉइड डिव्हाइसवरून ई-मेल अनसेंड कसा करायचा?**

तुम्ही ई-मेल पाठवल्यानंतर लगेच तुम्हाला तळाला ‘Sent’ आणि ‘Undo’ असे दोन पर्याय दिसतात.

त्यातल्या ‘Undo’ वर टॅप करा.

**आयओएस डिव्हाइसवर ई-मेल अनसेंड कसा करायचा?**


- इथेही ई-मेल पाठवल्यावर तुम्हाला ‘Sent’ आणि ‘Undo’ असे दोन पर्याय दिसतील.
- त्यातील ‘Undo’ ऑप्शनवर टॅप करा.

**कॉम्प्युटरवरून ई-मेल अनसेंड कसा करायचा?**

तुम्ही लिहलेला ई-मेल पाठवल्यावर लगेचच तुम्हाला खाली ‘Message sent’ टॅब दिसते आणि ‘Undo’ किंवा ‘View message’ असे पर्याय दिसतील.

‘Undo’ वर क्लिक करा.

नोट : तुमच्यकडे ई-मेल कॅन्सल किंवा अनसेंड करण्यासाठी ५ ते ३० सेकंदांचा कालावधी असतो.




**महत्त्वाची माहिती**

जीमेलमधील अनडू सेंड फीचर ई-मेल पाठवल्यावर अनसेंड करण्यासाठी कमीत कमी ५ तर जास्तीत जास्त ३० सेकंदाचा वेळ देतं. ही वेळ सुरुवातीपासून ५ सेकंद असते जी तुम्ही ३० सेकंदांपर्यंत वाढवू शकता.

**ई-मेल अनसेंड करण्याचा कालावधी कसा वाढवायचा?**

▮ तुम्ही अगदी सहज ई-मेल अनसेंड करण्याचा कालावधी वाढवू शकता. त्यासाठी तुम्हाला पुढील स्टेप्स फॉलो कराव्या लागतील.
▮ तुमच्या कॉम्प्युटरवरून जीमेल ओपन करा.
▮ तिथे उजवीकडे वरच्या बाजूला सेटिंगवर क्लिक करा.
▮ तिथे ऑल सेटिंग ऑप्शन शोधा.
▮ त्यानंतर ‘Undo send’ ऑप्शनची निवड करा आणि ५ ते ३० सेकंदामधून तुमच्या सोयीचा पर्याय निवडा.
▮ खाली स्क्रोल करा आणि बदल सेव्ह करा.

# भारतात हजारो पाकिस्तानी आले कुठून?

## मुख्यमंत्र्यांच्या नागपुरातच... ठाकरेंच्या सेनेचा सवाल

■**मुंबई** : ''पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकार भांबावल्यासारखे वागत आहे. एरवी राजकारण, कारस्थाने करण्यात वेळ घालवायचा आणि असा हल्ला झाला की, झोपेतून जागे व्हायचे. तसेच आताही झाले आहे. देशातील पाकिस्तानी नागरिकांना पाकिस्तानात हाकला या मोहिमेचा शुभारंभ केंद्र सरकारने केला खरा; पण जेथे वर्षानुवर्षे भाजपची सत्ता आहे तेथेच सर्वाधिक पाकिस्तानी सापडत आहेत.

म्हणजे इतकी वर्षे या लोकांनी झोपाच काढल्या हे नक्की. पुन्हा जेथे भाजपची सत्ता नाही किंवा आहे तेथे मुसलमान विद्यार्थी, फळवाले, भाजीवाले, कपडेवाले, लहान-मोठे व्यावसायिक यांना पाकिस्तानी नागरिक ठरवून त्यांना त्रास देण्याच्या मोहिमा सुरू केल्या जात आहेत. त्यामुळे मूळ पाकिस्तानी नागरिक, घुसखोर राहिले बाजूला; वेगळेच उद्योग सुरू झाले आहेत,'' असं म्हणत ठाकरेंच्या शिवसेनेनं संताप व्यक्त केला आहे.

**पहलगामसारख्या हल्ल्याची वाट पाहण्याची काय गरज होती?**

''देशात पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिक वाढले ते भाजपच्या कार्यकाळात. मात्र पहलगामचा हल्ला झाल्यावर देशातील पाकिस्तानी नागरिकांची पाकिस्तानात रवानगी करण्याची मोहीम केंद्र सरकारने सुरू केली आहे. खुद्द केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीच तशा सूचना देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना दिल्यानंतर प्रत्येक राज्यातून पाकिस्तान्यांची पाठवणी सुरू झाली. रविवारी सायंकाळी ही मुदत संपली तेव्हा शेवटच्या क्षणापर्यंत असंख्य पाकिस्तानी नागरिकांना अट्टारी सीमेवरून त्यांच्या देशात हाकलण्यात आले. मात्र ही मुदत संपल्यानंतरही हजारो पाकिस्तानी नागरिक देशात तळ ठोकून असल्याची माहिती समोर येत आहे. पाकिस्तानी नागरिकांना देशाबाहेर काढण्यात आले ते योग्यच आहे, पण त्यासाठी पहलगामसारख्या हल्ल्याची वाट पाहण्याची काय गरज होती, हा सर्वसामान्य जनतेला पडलेला प्रश्न आहे व तो चुकीचा नाही,'' असं 'सामना'च्या अग्रलेखात म्हटलं आहे.

**हजारोंच्या संख्येने पाकड्यांनी हिंदुस्थानात येऊन का राहावे?**

''मुळात हजारोंच्या संख्येने पाकड्यांनी हिंदुस्थानात येऊन का राहावे आणि आपल्या देशानेही त्यांना येऊ का द्यावे? आपण पाकिस्तानला शत्रुराष्ट्र मानतो ना, मग देशाच्या प्रत्येक राज्यात इतक्या प्रचंड संख्येने पाकिस्तानी नागरिक वैध, अवैध मार्गाने का येऊ दिले गेले? बरं, यापैकी किती पाकिस्तानी नागरिकांकडे व्हिसा व अन्य वैध कागदपत्रे आहेत व किती लोक बेकायदेशीरपणे घुसखोरी करून हिंदुस्थानात राहत आहेत, हादेखील संशोधनाचा विषय आहे. हिंदुस्थानात वास्तव्यास असलेल्या हजारो पाकिस्तान्यांमध्ये सिंध प्रांतातून आलेले हिंदू किती व मुस्लिम किती, याचीही बारकाईने पडताळणी व्हायला हवी,'' अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेनं केली आहे.

**फडणवीस आणि शिंदे वेगवेगळे दावे करतात**

''२७ एप्रिलची मुदत संपेपर्यंत यापैकी किती पाकिस्तानी परतले व किती अजूनही देशातच ठाण मांडून आहेत, हे कळायला मार्ग नाही. एकट्या महाराष्ट्राचेच उदाहरण घेतले तर आपल्या राज्यात तब्बल ५०२३ पाकिस्तानी राहत होते. यापैकी अनेकांना आता पाकिस्तानात हाकलण्यात आले असले तरी महाराष्ट्रात वास्तव्यास असलेले १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. या १०७ पाकिस्तानी नागरिकांचा पोलिसांनी खूप शोध घेतला, पण ते सापडले नाहीत, असे खुद्द राज्याच्या गृह राज्यमंत्र्यांनीच सांगितले असल्याने त्यावर विश्वास ठेवावा लागेल. मात्र त्यांच्या या बोलण्याला गृहखाते सांभाळणाऱ्या मुख्यमंत्र्यांनीच छेद दिला आहे. एकही पाकिस्तानी गायब नाही, असा दावा त्यांनी केला आहे. म्हणजे गृह राज्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री मिंधे १०७ पाकिस्तानी गायब म्हणत आहेत, तर मुख्यमंत्री फडणवीस तसे काहीही नाही, असे ठणकावत आहेत. इतक्या संवेदनशील गोष्टीत सरकारमध्येच एकवाक्यता नसेल तर कसे चालेल?₹ असा सवाल 'सामना'मधून विचारण्यात आला आहे.

**याचे उत्तर आहे काय?**

''उपमुख्यमंत्र्यांच्या ठाणे शहरात एक हजारहून अधिक पाकिस्तानी नागरिक राहत होते व त्यापैकी ३३ गायब आहेत. राज्याच्या एकूण ४८ शहरांत पाकिस्तानी नागरिकांनी हातपाय पसरले आहेत व व्हिसाची मुदत संपल्यानंतर किंवा वैध कागदपत्रांशिवाय ते इथे राहत आहेत. देशाच्या सुरक्षेसाठी हे धोकादायक नाही काय? महाराष्ट्रात ५ हजारांहून अधिक, राजस्थानात ३० हजार, छत्तीसगडमध्ये २ हजार, मध्य प्रदेशात २२८ व खुद्द देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत ५ हजार पाकिस्तानी बिनबोभाटपणे राहत असतील तर देशाच्या सुरक्षेशी तो मोठाच खेळ आहे. मुळात पाकिस्तानसारख्या शत्रुराष्ट्रातील हजारो लोक बेकायदेशीरपणे हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात जाऊन बिऱ्हाडे थाटतातच कशी? हे एवढे आले कोठून? पुन्हा पहलगामच्या हल्ल्यानंतरच हिंदुस्थानात राहणाऱ्या या हजारो पाकिस्तानी नागरिकांची आठवण सरकारला कशी झाली? सरकारकडे याचे उत्तर आहे काय?'' असा सवाल लेखाच्या शेवटी ठाकरेंच्या पक्षाने विचारला आहे.



**एकट्या नागपूरमध्ये अडीच हजार पाकिस्तानी**

''महाराष्ट्रातील ४८ शहरांत ५०२३ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास होते. त्यापैकी निम्म्याहून अधिक म्हणजे २ हजार ४५८ पाकिस्तानी एकट्या नागपूर शहरातच असल्याचे समोर आले. नागपूर हे राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेले शहर, पण नागपुरातच अडीच हजार पाकिस्तानी राहत असतील व त्यापैकी सुमारे ३० पाकिस्तान्यांची कुठलीच माहिती पोलीस प्रशासनाकडे नसेल तर देशाबरोबरच महाराष्ट्राचीही सुरक्षा रामभरोसेच आहे, असे म्हणावे लागेल,'' असा खोचक टोला ठाकरेंच्या शिवसेनेने लगावला आहे.

**सरकार नावाची यंत्रणा, देशाचे गृहखाते व गुप्तचर यंत्रणा नेमके काय करीत आहेत?**

''मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्री अशी परस्परविरोधी माहिती देत असतील तर जनतेने विश्वास तरी कुणावर ठेवायचा? सीमेवर सुरक्षा दलांचा खडा पहारा असताना या घुसखोरांनी बिळे कशी केली? देशाचे पंतप्रधान स्वतःला जनतेचा चौकीदार म्हणवून घेतात, पण सीमेला भगदाडे पाडून पाकिस्तानी नागरिक, घुसखोर, अतिरेकी सीमा ओलांडून हिंदुस्थानात येत असतील, देशाच्या राज्यात जाऊन आरामात राहत असतील व पहलगामसारखे हल्ले आणि हत्याकांडे घडवून गायब होत असतील तर सरकार नावाची यंत्रणा, देशाचे गृहखाते व गुप्तचर यंत्रणा नेमके काय करीत आहेत?'' असा थेट सवाल ठाकरेंच्या शिवसेनेने विचारला आहे.

# लोकल ट्रेन लेट... मग बोटीने कामाला जा

## मुंबईत धावणार वॉटर टॅक्सी, कोच्ची करणार मदत

■**मुंबई** : मुंबईच्या लोकल ट्रेनने कामाला जाण्याचा अवघड टास्क केवळ मुंबईकरांना ठावूक असतो. कारण मुंबईतील लोकल ट्रेन एक मिनिट जरी लेट झाली तर घड्याळ्याच्या काट्यावर धावणाऱ्या मुंबईकरांचे सारे गणित बिघडतं... त्यावर आता पर्याय जल वाहतूकीचा आहे. मुंबईत जलवाहतूकीचे मार्ग सुरु झाले तर मुंबईकरांना पयार्यी वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे.

मुंबईत जल मेट्रो योजना राबविण्याची घोषणा महाराष्ट्राचे मत्स्य पालन आणि बंदर विकास मंत्री नितेश राणे यांनी केली आहे. मुंबईत आता जलवाहतूक जर खात्रीशीर आणि सुरक्षित झाली तर मुंबईकरांच्या उपनगरी लोकलचा भार थोडा तरी कमी होईल. यासाठी कोच्ची वॉटर टॅक्सीचा आदर्श घेण्यात आला आहे. या महिन्याच्या अखेर या संदर्भात एक डीपीआर तयार करण्यात आला आहे.

**२१ प्रस्तावित स्थानकांची यादी**

वॉटर मेट्रो प्रकल्पांतर्गत एकूण २१ प्रस्तावित स्थानकांची यादी तयार केली आहे, यात वैतरणा नदीजवळील स्थानके, वसई, ठाणे, मनोरी, पनवेल आणि मुंबई पोर्ट ट्रस्ट यांचा समावेश केला आहे. पहिल्या टप्प्यात वॉटर मेट्रो सेवा सुरू केली जाईल, तर दुसऱ्या टप्प्यात रो-रो (रोल ऑन-रोल ऑफ) सेवेत वाढ केली जाणार आहे.



**५०-५० टक्के सहभागातून योजना राबविणार**

मुंबई जल मेट्रो योजना लागू करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या दरम्यान ५०-५० टक्के भागीदारीत ही योजना राबविली जाणार आहे. मुंबई सात बेटांपासून बनविली आहे. या योजनेत सर्व जलमार्गांना सक्रीय केले जाणार आहे. रस्ते मार्ग आणि उपनगरीय लोकल सेवेवरील वाढता ताण कमी करण्यासाठी ही योजना आखण्यात आली आहे. वॉटर मेट्रो प्रकल्पामुळे शहरी भागातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा तर होईलच शिवाय मुंबईच्या पर्यटन क्षमतेलाही चालना मिळणार आहे.. कोच्ची वॉटर मेट्रो प्रकल्प महाराष्ट्र सरकारला सहाय्यभूत ठरणार आहे.. या प्रकल्पांतर्गत, मुंबई महानगर प्रदेशाच्या (एमएमआर) विविध भागांना जोडण्यासाठी इलेक्ट्रीक बॅटरीवर चालणाऱ्या स्पीड बोटी या जलमार्गावर धावणार आहेत.

# राज्यातील जिल्ह्यांना यलो अलर्ट




■**मुंबई** : ऊन्हाळा सुरू असला तरी अवकाळी पावसाचे संकट राज्यावर अजूनही कायम आहेच. काही दिवासंपासून राज्यात विविध भागात पावसाने हजेरी लावली असून येत्या काळातही पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील काही भागांतील कमाल तापमानाचा पारा काहीसा उतरला असून, सोमवारी अमरावती, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट, यासह ताशी ५० ते ६० कि.मी. वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सात जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान मध्य महाराष्ट्रातील हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील काही भागांसह मराठवाड्यातील कमाल तापमानात १ ते २ अंश सेल्सिअसने घट झाली. मध्य महाराष्ट्रात कोल्हापूर, नाशिक, सांगली, सातारा तसेच सोलापूरसह विदर्भात नागपूर, गोंदिया, वर्धा आणि यवतमाळ भागातील तापमानाचा पारा उतरला आहे.

# विद्यार्थ्यांचे समायोजन अडचणीत... 'फी'मुळे पालकांचे कंबरडे मोडणार

■**ठाणे** : महापालिका हद्दीतील अनधिकृत शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे समायोजन इतर शाळांमध्ये करण्याचा स्तुत्य निर्णय शिक्षण विभागाने घेतला असला तरी या निर्णयामुळे पालकांच्या अडचणी वाढणार आहेत. नवीन शाळेत प्रवेश घेताना त्या शाळेची वार्षिक शैक्षणिक फीचे ओझे पालकांना परवडणार का? हा प्रश्न आहे. जर फी भरली नाही तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडण्याची शक्यता आहे.

ठाणे महापालिका हद्दीतील अनाधिकृत असलेल्या ८१ शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन शिक्षण विभागाने करण्याचे निश्चित केले असले तरी देखील ज्या शाळांमध्ये या विद्यार्थ्यांना धाडण्याचा प्रयत्न शिक्षण विभागाकडून हाती घेण्यात आला आहे. त्या शाळांची फी त्या विद्यार्थ्यांना परवडणार का? असा प्रश्न आता या निमित्ताने उपस्थित झाला आहे. किंबहुना त्यांच्या पालकांना ती फी भरणे शक्यच होणार नसल्याचे चित्र दिसत आहे.

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून दरवर्षी अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली जात असते. परंतु त्यावर योग्य ती कारवाई होतांना दिसत नाही. त्यामुळे अशा शाळांमध्ये विद्यार्थी आजही शिक्षण घेताना दिसत आहेत. परंतु यंदा महापालिकेच्या शिक्षण विभागाने अशा शाळांची यादी जाहीर केली असून त्यामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची देखील यादी जाहीर केली आहे. तसेच नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी या शाळा बंद करण्यासाठी शिक्षण विभागाचे प्रयत्न असणार आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण ८१ अनधिकृत शाळा असून त्यात १९७०८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी त्यांचे इतर अधिकृत खासगी शाळांमध्ये समायोजन करण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न सुरू केले होते. यासाठी त्यांनी शाळा प्रशासनासोबत बैठकाही घेतल्या होत्या. या बैठकानंतर १९ खाजगी शाळांनी विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याची तयारी दाखविली. यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाल्याचे चित्र होते. परंतु बेकायदा शाळेतील शुल्कापेक्षा या शाळांचे शुल्क जास्त असून ते परवडण्याजोगे नसल्याने पालकांपुढे मोठा पेच निर्माण झाला आहे.

अनेकांची अधिकृत घर घेण्याइतकी आर्थिक परिस्थिती नसते. त्याचाच फायदा भूमाफिया घेतात आणि त्यांना बेकायदा बांधकामांमध्ये स्वस्त दरात घरे विकून त्यांची फसवणूक करतात. असाच प्रकार आता शाळांच्या बाबतीतही समोर आला आहे.

**बेकायदा शाळांकडून कमी शुल्क आकारणी**

अधिकृत शाळांचे शुल्क हे जास्त असते. अनेकांना ते परवडत नाही. त्याचा फायदा घेऊन काहीजण बेकायदा शाळा उभारून त्यात कमी शुल्क ठेवतात. त्यामुळे अशा शाळांमध्ये पालक विद्यार्थ्यांचा प्रवेश घेत आहेत. मात्र, कोणत्याही परवानगीविना चालवित असलेल्या या शाळांचालकांकडून पालकांची फसवणूक होत असल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे.



# लवकरच पालिकेच्या सेवेत सात नवीन सहाय्यक आयुक्तांची वर्णी... अतिरिक्त कार्यभार कमी होणार

■**ठाणे** : पालिकेवर असलेला अतिरिक्त कामाचा ताण कमी होणार असून लवकरच सात नवीन सहाय्यक आयुक्त पालिकेच्या सेवेत दाखल होणार आहेत. नवीन दाखल होणाऱ्या सहाय्यक आयुक्तांमुळे ठाणे महापालिकेमार्फत देण्यात आलेल्या कार्यालयीन अधीक्षक आणि इतर सहाय्यक आयुक्तांना देण्यात आलेला अतिरिक्त कार्यभार कमी होणार आहे.

ठाणे महापालिकेत मागील काही महिन्यांपासून अधिकारी, कर्मचारी हे सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे पालिकेकडे उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांवरील ताण वाढत असल्याचे दिसून आले आहे. तसेच नवीन कर्मचाऱ्यांची भरती करण्यातही पालिकेपुढे आस्थापना खर्चाच्या अडचणी आहेत. त्यात मागील काही महिन्यांपासून ठाणे महापालिकेत सहाय्यक आयुक्त देखील कमी झाल्याने, ठाणे महापालिकेच्या माध्यमातून कार्यालयीन अधीक्षकांच्या खांद्यावर सहाय्यक आयुक्तपदाची मदार सोपविण्यात आली आहे. तसेच काही सहाय्यक आयुक्तांना इतर प्रभाग समितीचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे एकाच वेळेस एक ते तीन प्रभाग समितीचा कारभार हाकतांना सहाय्यक आयुक्तांवरील ताण वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत होते. तसेच त्याचा परिणाम कामावर देखील होतांना दिसून आला आहे.

दुसरीकडे कार्यालयीन अधीक्षकांच्या खांद्यावर सहाय्यक आयुक्तपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याने पालिकेवर टीका देखील झाली होती. त्यामुळे रिक्त असलेल्या पदांवर सहाय्यक आयुक्त मिळावेत यासाठी महापालिकेने राज्य शासनाकडे पत्रव्यवहार केला होता. त्यानंतर आता ठाणे महापालिकेला एकाच वेळेस सात सहाय्यक मिळालेत आहेत. या संदभार्तील आध्यादेश राज्यशासनाकडून मंगळवारी काढण्यात आले आहेत. परंतु ज्या कार्यालयीन अधीक्षकांच्या खांद्यावर सहाय्यक आयुक्तपदाची धुरा देण्यात आली होती. त्यांना मूळ पदावर आणले जाणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच नव्याने दाखल झालेल्या सहाय्यक आयुक्तांना कोणत्या विभागाचा कार्यभार सोपविला जाणार, हे पाहणे देखील महत्त्वाचे ठरणार आहे.

**१८ पदे मंजूर**

ठाणे महापालिकेत १८ सहाय्यक आयुक्तांची पदे मंजूर आहेत. त्यातील १० पदे भरली गेली आहेत. तीन पदांवर पालिकेचे अधिकारी आहेत. त्यानुसार आठ पदे रिक्त असल्याची माहिती ठाणे महापालिकेने दिली आहे.

**या अधिकाऱ्यांचा समावेश**

यात गौरव वांदेकर, शिवप्रसाद नागरगोजे, स्वप्नील चव्हाण, अर्जुन सुरवसे, विजय कावळे, सोमनाथ बनसोडे आणि सोनल काळे हे आता ठाणे महापालिकेत सहाय्यक आयुक्त पदावर रुजू होणार आहेत. ही पदे भरली गेल्याने आता ठाणे महापालिकेतील अधिकाऱ्यांवरील ताण काही प्रमाणात कमी होणार आहे.




# नशामुक्त नवी मुंबई अभिनायाला काही पोलिसांकडून सुरुंग

■ **पनवेल** : नवी मुंबईतील सीवूड्स एनआरआय पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी (२५ एप्रिल) बिल्डर गुरुनाथ चिचकर यांनी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली होती. या प्रकरणात आता धक्कादायक माहिती समोर आली आहे. चिचकर यांचा मुलगा नवीन चिचकर याचे ड्रग्जचे सिंडिकेट पोलीस कर्मचारी सचिन भालेराव सांभाळत होता.

या प्रकरणी भालेरावला अटक करण्यात आली असून आणखी एका पोलीस कर्मचारी विजय पाटील याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. तर एक पोलीस कर्मचारी फरार आहे. या घटनेमुळे नशामुक्त नवी मुंबई अभियानाला काही पोलीस कर्मचाऱ्यांनीच सुरूंग लावल्याचे स्पष्ट झाले आहे.



गुरुनाथ चिचकर यांनी शुक्रवारी सकाळी साडेसहा-सातच्या सुमारास आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी चिचकर यांनी सुसाईड नोटमध्ये नवी मुंबई अंमली पदार्थ विरोधी पथकातील अधिकाऱ्यांवर त्रास दिल्याचा आरोप केला होता. त्यानंतर पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन केली होती.

यातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. प्राथमिक तपासात खारघर पोलीस ठाण्यातील कर्मचारी सचिन भालेराव सतत गुरुनाथ चिचकर यांच्याशी संपर्क साधत असल्याचे निदर्शनास आले आहे. तपासाचा अंदाज लागताच भालेराव मूळ गावी पळून गेला होता. मात्र, नवी मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला गावातून पकडले आहे.

नवी मुंबई पोलीस दलाकडून नशामुक्त नवी मुंबई अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी कारवाई सुरू होती. मात्र, नशामुक्त नवी मुंबई अभियानाला पोलीस दलाकडूनच सुरुंग लावण्यात आल्याचे उघड झाले आहे. ड्रग्जच्या रॅकेटमध्ये तीन पोलीस कर्मचाऱ्यांचे नाव समोर आल्याने खळबळ उडाली आहे. अधिक चौकशीनंतर आणखी बरीच नावे बाहेर येण्याची शक्यता सांगितली जात आहे.

# बसचालकाकडून विद्यार्थ्याचे लैंगिक शोषण

■ **नवी मुंबई** : सीवुड्स येथील दिल्ली पब्लिक स्कूलच्या स्कूल बसचालकाने ४ वर्षीय मुलाचे लैंगिक शोषण केल्याची घटना घडली. याप्रकरणी एनआरआय पोलिसांनी या स्कूल बसचालकाविरोधात लैंगिक शोषणासह पोक्सो कलमानुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते मोरे, जिल्हाप्रमुख प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी-शिवसैनिक २५ एप्रिल रोजी शाळा प्रशासनाला जाब विचारण्याकरिता गेले असता शालेय व्यवस्थापनाने गेट उघडण्यास नकार दिला. त्यामुळे शिवसैनिकांचा संताप अनावर झाला आणि शाळेमध्ये घुसून मुख्याध्यापकांना चांगलेच धारेवर धरले.

याप्रकरणी मुख्याध्यापकांविरोधात आणि शाळा प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तसेच पोलीस प्रशासनाला मुख्याध्यापकांना सदर प्रकरणात सहआरोपी करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. मनसे पदाधिकाऱ्यांनी डीपीएस शाळेचे मुख्याध्यापक हरिशंकर वशिष्ठ यांना घेराव घातला.

# एकाच दिवशी घडल्या २ घटना

## जन्मदात्या पित्याचा ६ वर्षाच्या लेकीवर बलात्कार

■ **नवी मुंबई** : नवी मुंबईत एकाच दिवशी बलात्काराच्या दोन घटना घडल्या आहेत. यामुळे खळबळ उडाली आहे. जन्मदात्या पित्याचा ६ वर्षाच्या लेकीवर बलात्कार केला आहे. तर, दुसरा घटनेत स्कूल बस चालकाने चार वर्षाच्यामुलीवंर लैंगिक अत्याचार केला आहे.



पहिली घटना पनवेलमध्ये घडली आहे. पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे. जन्मदात्या पित्याने आपल्या सहा वर्षाच्या मुलीवर बलात्कार केला आहे. जयेश पाटील असे या नराधम पित्याचे नाव आहे. जयेश पाटील विरोधात बलात्कारसह पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी जयेश आणि त्याच्या पत्नीमध्ये घटस्फोट झाला असून मुलीचा ताबा न्यायालयाने जयेश कडे दिला होता. मागील 15 दिवसांपासून नराधम पिता आपल्याच मुलीवर अतिप्रसंग करत होता. लघवीच्या जागेवर आणि पोटात दुखतं असल्याचे पीडितेने नातेवाईकांना सांगितल्यावर आईच्या मदतीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पनवेल तालुका पोलीसांनी आरोपी जयेश पाटील याला अटक केली असून अधिक तपास करण्यात येत आहे.

दुसऱ्या घटनेट स्कूल बसच्या चलाकाने विद्यार्थीनींवर अत्याचार केला आहे. नवी मुंबईतील एनआरआय पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका शाळेच्या बस चालकाने चार वर्षीय विद्यार्थी मुलासोबत अनैसर्गिक कृत्य केल्याचं बाब समोर आली आहे. याबाबत विद्यार्थ्याच्या पालकांनी एनआरआय पोलीस ठाण्यात धाव घेतली व घडलेला प्रकार सांगितला. यानंतर पोलिसांनी अधिक तपास केला.

आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आल असून आरोपीला अटक देखील करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास तांत्रिक दृष्टीने देखील केला जात आहे. तब्बल ४४ सीसीटीव्हीचे फुटेज तपासण्यात येत आहे, बस मधील सीसीटीव्ही आणि बस अटेंडन्स चा जबाब नोंदविण्यात एल्ली. अधिक तपास नवी मुंबई पोलीस करत आहेत.

# मुलीची हत्या करून विवाहितेची आत्महत्या



■ **नवी मुंबई** : घणसोलीतील चिंचआळीत राहणाऱ्या एका विवाहितेने आपल्या ६ वर्षीय मुलीची गळा आवळून हत्या केल्यानंतर स्वतः देखील गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. आजारपणातून आलेल्या नैराश्यातून या विवाहितेने हा प्रकार केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार पोलिसांकडून या घटनेचा अधिक तपास करण्यात येत आहे. या घटनेतील मृत विवाहितेचे नाव प्रियंका महादेव कांबळे (२५) असे असून तिच्या मुलीचे नाव वैष्णवी कांबळे (६) असे आहे. प्रियंका, पती महादेव कांबळे व मुलगी वैष्णवी यांच्यासोबत घणसोली गावातील चिंचआळीतील महाशेरावाली अपार्टमेंटमध्ये राहत होती. प्रियंकाचा पती कपड्याच्या दुकानात कामाला असल्याने बुधवारी रात्री उशिरापर्यंत तो दुकानावर होता. घरामध्ये मुलीसह असलेल्या प्रियंकाने मध्यरात्रीच्या सुमारास आपल्या मुलीची गळा आवळून हत्या केली. त्यानंतर तिने देखील ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. कांबळे यांच्या घराची खिडकी उघडी असल्याने शेजाऱ्यांना प्रियंका कांबळे गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com